शनिवार
५ एप्रिल १९८०
७५ पैसे

साप्ताहिक माणूस



# अभिनंदन

चाळी पडू लागल्या, माणसे ब्लॉकमध्ये राहायला जाण्यासाठी धडपडू लागली, शहरातून चाळींऐवजी सेल्फ कन्टेन्ड ब्लॉक्सची व त्यात राहणाऱ्या मध्यमवर्गीयांची संख्या वाढू लागली आणि मराठी साहित्यात 'पु. ल. पर्व' सुरू झाले. विनोद, उपहास, विडंबन, कोटीबहाद्दुरी, जे लयाला चालले आहे त्याबद्दल 'जुने जाउ द्या मरणालागुनी' असा तुकडा तोडणारा कठोरभाव न बाळगता, जाणाऱ्याला फलाटावर डबडबता निरोप देण्याचा गोड हळवेपणा, यामुळे पु. लं. नी बटाटयाच्या चाळीपासून मराठी कानामनांना जिंकून आपलेसे केले आणि पु. ल. पर्वाची रसावहता पुढे, गेल्या तपादोनतपात अधिकाधिक वाढतच गेली.

साहित्य-संस्कृती प्रांतातला एकही सन्मान असा उरला नाही ! की ज्याचा पु. लं. वर या पर्वात वर्षाव झाला नाही. मग तो पद्मश्रीची राजमान्यता असो की इचलकरंजी साहित्यसंमेलनाची रसिकमान्य अध्यक्षता असो. संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर नव्याने उदयास आलेल्या मध्यमवर्गाने –ग्रामीण आणि शहरी–आपल्या साहित्यिक आणि सांस्कृतिक प्रांताचे राजेपणच पु. लं. ना जणू बहाल करून टाकले.

पुणे विद्यापीठाने गेल्या आठवडयात त्यांना सन्माननीय डी. लिट्. पदवी दिली.

त्या वेळच्या आपल्या भाषणात हा विद्वानांचा आशीर्वाद आहे असे पु. लं. नी म्हटले खरे; पण ही त्यांची नम्रता आहे. वास्तविक विद्वानांनी रसिकांच्या मान्यतेवर उठवलेली ही मोहोर आहे.

माणूस परिवाराकडून पु. लं. चे यासाठी अभिनंदन. □

# मुंबई वार्ता

किरण जोग

## □ स्वतंत्र कामगार संघटना

कामगार संघटना व त्यांचे मोर्चे या गोष्टी मुंबईकरांना नवीन नाहीत. डाव्या आघाडीपासून ते मजदूरसंघापर्यंत सर्व विचारसरणीच्या कामगार संघटना, जॉर्ज फर्नांडीस यांच्यापासून ते बगाराम तुळपुळेंपर्यंत अनेक नेत्यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत रस्त्यावर आलेल्या होत्या–आहेत. यापैकी बहुतेक कामगार संघटनांची बांधिलकी कोणत्या ना कोणत्या पक्षाशी असतेच. स्वतंत्र विचारसरणीच्या कामगार संघटना व एखाद्या व्यक्तीने सुरू केलेल्या कामगार संघटना या गोष्टी तशा मुंबईत अपवादात्मकच ! मुख्य अपवाद आर. जे. मेहता व त्यांच्याशी संलग्न कामगारसभा यांचा ! वेगवेगळ्या प्रकारे विचार करताही या संघटनेने कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी पत्करली असे दिसत नाही; परंतु तरीही ७७ च्या लोकसभा निवडणुकीत श्री. मेहता यांनी जनता पक्षाचे लोकसभेसाठी तिकीट मिळविण्याचा प्रयत्न केलाच. असो.

परंतु आता मात्र आर. जे. मेहता यांच्याबरोवर डॉ. दत्ता सामंत यांचेही नाव स्वतंत्र कामगार संघटना बांधणाऱ्यांमध्ये घ्यावे लागेल असे दिसते. कारण गेल्याच आठवडयात डॉ. सामंत यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील कामगारांचा जो प्रचंड मोर्चा आयोजित करण्यात आलेला होता तो मोर्चा व त्या वेळेचे डॉ. सामंत यांचे भाषण, यावरून यापुढे दत्ता सामंत कोणत्याही पक्षाशी संलग्न संघटना न ठेवता स्वतःचे नेतृत्व असलेली कामगार संघटना बांधण्याचा प्रयत्न करतील असे दिसते.

गेल्या दहा वर्षात कुर्ल्याच्या प्रिमिअरपासून ते डोंबिवलीच्या एम. आय. डी. सी. पर्यंत सर्व भागात स्वतःचा दबदबा निर्माण करून आपल्या नेतृत्वाखाली दत्ता सामंत यांनी आपली शक्ती वाढवली आहे; परंतु ही शक्ती आजतागायत इंटक या कॉंग्रेस पक्षाला जवळ असलेल्या कामगार संघटनेशी संलग्न होती, किंबहुना डॉ. सामंत व इंटक या गोष्टी मुंबईत लोकांना भिन्न वाटल्याच नाहीत. गेल्या वर्षाभरात हीच शक्ती कॉंग्रेस(इं)च्या मागे उभी राहत होती; परंतु परवाच्या प्रचंड मोर्चाच्या निमित्ताने हे स्वच्छ झाले की यापुढे स्वतःचे नांव व ' इमेज ' तयार करण्यासाठी व कोणत्याही पक्षाशी संलग्न न ठेवता ' सामंत ' नावाखाली उभी करण्याच्या हेतूने ही कामगारांची ताकद वापरण्यात येईल. ही गोष्ट एकदम घडलेली नाही. किंबहुना गेले वर्षभर चाललेल्या गोष्टींचे, युनिअनच्या राजकारणाचे फक्त स्वरूप परवाच्या मोर्चाने स्पष्ट झाले इतकेच !

गेल्या वर्षभरात डॉ. सामंत यांच्या प्रत्येक तंटा सोडविण्याच्या कामी घेतलेल्या आग्रही भूमिकेमुळे त्यांच्याच युनिअनचे अनेक कार्यकर्ते त्यांच्यापासून दूर जाऊ लागले. प्रिमिअर हे याचे प्रातिनिधिक उदाहरण. हजारो कामगार असलेला प्रिमिअरसारखा कारखाना महिनोनमहिने एका नेत्यामुळे बंद राहू शकतो ही गोष्ट सदासर्वकाळ सर्वांना रुचणारी नव्हती व नाही. श्री. जी. पी. गलगली यांनी व इतर अनेकांनी त्याला विरोध केला; परंतु दहशतवादाची अनेक रूपे, कामगारांना त्यांच्या मागण्या मान्य होतील अशी लावलेली आशा व १० विखुरलेल्या माणसांपेक्षा ४ एकत्र माणसे ताकदवान असतात हा अनुभव या सर्वांमुळे डॉ. सामंतांच्या नेतृत्वाखाली प्रिमिअरचा संप चालू राहिला होता.

प्रिमिअर हे एक उदाहरण झाले; परंतु इतरही अनेक कारखाने आहेत. या व अशा अनेक गोष्टींमुळे इंटकपासून व कॉंग्रेस(इं.)च्या नेत्यांपासून डॉ. सामंत दूर जाऊ लागले. नंतर १९७९ च्या लोकसभा निवडणुका आल्या व डॉ. सुब्रमण्यम स्वामींविरुद्ध कॉंग्रेस(इं.)ने दत्ता सामंत यांना तिकिट नाकारले. यात काही पूर्वउपनगरात कारखाने असलेल्या उद्योगपतींचाही हात होता असे म्हणतात. असो. परंतु त्यामुळे सामंतांनी स्वतःच्या ताकदीवर लोकसभा निवडणूक लढवली व बऱ्यापैकी मते मिळवली. किंबहुना डी. एन. चौलकरांचा निसटता पराभव हा सामंत यांना मिळालेल्या मतांमुळे झाला हे जनता कार्यकर्तेही मान्य करतात.

सारांश असा की, या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर दत्ता सामंत हे यापुढे आपल्या हातात असलेल्या कामगारशक्तीच्या जोरावर

पृष्ठ २२ वर

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : पंचेचाळीसावा
५ एप्रिल १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# यंत्रयुगातील महाकाव्य

येथील टिळकपथावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात 'अयोध्यानगरी' असा मंडप उभारून त्यांत कै. ग. दि. मा. यांच्या गीतरामायणाचा रजत महोत्सव झाला. त्या महोत्सवाचे उद्घाटन खा. वाजपेयी यांनी केले. अध्यक्षस्थानी पं. भीमसेन जोशी होते. प्रमुख पाहुणे होते श्री. शरद पवार. उद्घाटनाच्या आपल्या भाषणात वाजपेयी यांनी यंत्रयुगातील महाकवी म्हणून ग. दि. मा. यांचा व यंत्रयुगातील महाकाव्य म्हणून गीतरामायणाचा गौरव केला.

यंत्रयुगातील महाकाव्य म्हणून गीतरामायण याचा त्यांनी केलेला गौरव बरोबर होता. कारण गीतरामायण हे आकाशवाणीसाठी लिहिले गेले आणि आठवडयास एक याप्रमाणे ते वर्षात पुरे करावयाचे. यामुळे ५६ गीतात त्यांनी ते बसविले. कार्यक्रम आकाशवाणीवर असल्यामुळे प्रत्येक गीतास दिलेली वेळही ठरलेली होती. तेवढया वेळात कथेचा ओघ ठेवण्यासाठी करावयाचे निवेदन व गीत ही दोन्ही बसवावयाची होती. रामायण यंत्रात बसवावयाचे होते !

जरी अशी यंत्रयुगात आपली गीते बसवावी लागली तरी ग. दि. मा. यांनी त्यात प्रतिभेला उणे पडून दिले नाही. या गीतांचा गौरव अन्यत्र येऊन गेल्यामुळे मी त्यासंबंधी लिहीत नाही. मी एवढेच लिहितो की, वाल्मीकि रामायणातील कोणते प्रसंग निवेदनासाठी निवडावयाचे याची अप्रतिम जाण ग. दि. मा. यांनी दाखविली आहे. तसेच, सुधीर फडके यांच्या सुंदर गायनाबद्दलही मी लिहीत नाही.

¤

गीतरामायणासारखी संक्षिप्त रामायणे पूर्वीपासून आहेत. सर्वात लघु रामायण एका श्लोकाचे आहे. माझ्या एका मित्राच्या मुलाकडून मी ते शिकलो. हे एकश्लोकी रामायण पुष्कळांना ठाऊक नसेल म्हणून देतो.

आदौ रामतपोवनादिगमनम् ।<br>
हत्वा मृगः कांचनम् ।<br>
वैदेहीहरणं जटायुमरणम् ।<br>
सुग्रीवसंभाषणम् ।<br>
वालीनिर्दलनम् समुद्रतरणम् ।<br>
लंकापुरी दाहनम् ।<br>
पश्चात रावण कुंभकर्ण हननम् ।<br>
एतद्धि रामायणम् ।।

हे लघुतम रामायण कुणी रचले मला ठाऊक नाही; पण त्या कवीने रामायणातले कोणते प्रसंग निवडले याची गम्मत आहे. याहून दीर्घ असे रामायण लोमशाचे. हा लोमशमुनी प्रभु रामचंद्रास समकालीन होता. अशीच थोडक्यात आणलेली रामकथा महाभारतातील एका उपाख्यानात आहे. 'रामायणं महाकाव्यं उद्देश्यं नाटकीकृतम्' असा त्याचा महाकाव्य म्हणून व त्यावर तेव्हा नाटके रचीत म्हणून उल्लेख आहे. आनंदरामायण, अग्निवेश्य रामायण, अन्यथा रामायण अशी आणखी संस्कृत रामायणे आहेत; पण ही संस्कृत रामायणे व गीतरामायण यात मोठे अंतर आहे. या संस्कृत रामायणांतून सर्व रामायणकथा त्या त्या कवीने संक्षेपाने आणली असल्याने ती रामायणे वाल्मीकीच्या रामायणातील प्रसंगांची केवळ जंत्री होतात. त्यात रसपरिपोष नाही. उलट गीतरामायणात रामायणातील रसपरिपोष होतील असे छपन्नच प्रसंग वेचून, त्यावर गीते रचून, कथानकाचा मधला उरला भाग गद्यातून निवेदन करून, मूळ रामायणातील रस न घालविता आपले गीतरामायण ग. दि. मा. यांनी सादर केले. ते स्वतः यंत्रयुगातील असल्याने आजच्या श्रोत्यांना रामायणकथेत कसा रस लागेल हे त्यांनी बरोबर पाहिले.

¤

गीतरामायणाचा हा रजतमहोत्सव सतरा मार्च १९८० ला सुरू होऊन रामनवमीचे दिवशी म्हणजे दि. २४-३-८० ला त्याची समाप्ती झाली. प्रत्येक दिवशी एक प्रमुख पाहुणा व अध्यक्ष अशी योजना केली होती. त्याचप्रमाणे समारंभ रात्री साडेनऊ वाजता आरंभ होऊन साधारण दोन वाजता संपे. कार्यक्रमाच्या आरंभी दुसऱ्या भाषेत भाषांतरित अशी गीतरामायणाची गीते म्हटली जात. ही बहुधा दोन भाषांतील दोन दोन गीते असत. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे व अध्यक्षांचे अशी भाषणे होत. त्याशिवाय व्यवस्थापकमंडळीतील लोकांची भाषणे होत. ता भापणानंतर सुधीर फडके हे गीतरामायणातील सात गीते म्हणून त्या रात्रीचा कार्यक्रम संपे.

वर्तमानपत्रांचा अंदाज असा आहे की, या कार्यक्रमात रोज पंधरा हजारापर्यन्त श्रोतृसमुदाय होता. भारतीय बैठक व खुर्च्या अशा दोनच श्रोत्यांसाठी बसण्याच्या तऱ्हा होत्या. भारतीय बैठक दोन रुपये व खर्चो पाच रुपये असे तिकिटांचे दर होते. न्यू इंग्लिश स्कूलचे हे पटांगण विस्तृत आहे. त्यात शिरताच उंच व्यासपीठ उभारले होते. व्यासपीठाच्या मागे पडद्यावर धनुष्य

सरसावलेल्या धनुर्धारी श्रीरामचंद्राचे चित्र होते व त्या चित्राच्या बाजूंनी रामायणातील वेगवेगळे प्रसंग चित्रित केले होते. तेथेच डाव्या हातास ग. दि. मा. यांचे छायाचित्र ठेवलेले होते. या पडद्यापुढे भारतीय बैठकीवर पाहुणे मंडळी बसत आणि त्यांच्यासमोर व्यासपीठावर गीतगायन होई.

गीतरामायणाने लोक किती वेडे झाले आहेत हे सहज दृष्टिक्षेप टाकला तरी कळत होते. पूर्वी गंधर्वांच्या नाटकाच्या वेळी श्रोते नाटकाचे पुस्तक घेऊन येत. त्यानंतर पहिल्यांदाच पुस्तक घेऊन कार्यक्रमास येण्याची घटना या महोत्सवात घडली. कित्येक श्रोत्यांजवळ गीतरामायणाचे पुस्तक दिसत होते. तसेच गीत सुरू झाले की, कित्येकजण ते स्वतःशी गुणगुणताना किंवा गुणगुणत ठेका धरताना ऐकू येत होते. गीतरामायण श्रोत्यांचे लाडके आहे याचे आणखी एक गमक म्हणजे कार्यक्रमातील आधीची दुसऱ्या भाषेतील गीते आणि त्याहूनही कंटाळवाणी भाषणे श्रोते शांतपणे ऐकत होते, केवळ गीतरामायणाची पुढील सात गीते ऐकण्यासाठी !

सबंध उत्सवात तिघाचौघांचीच भाषणे चांगली झाली. पहिल्या दिवशीच्या भाषणात वाजपेयींनी खुसखुशीत, द्व्यर्थी भाषण केले. ते म्हणाले, 'परकीयांचा पराभव करून राष्ट्रीय अस्मिता उंचावणाऱ्या, राष्ट्रीय गौरव वाढविणाऱ्या महापुरुषाच्या प्रेरक स्मरणाचा हा दिवस. नवरसांचा रामकथेचा हा कधीही न खळणारा प्रवाह अनंत आहे —अगाध आहे. रामकथा या देशाच्या सर्व दिशांमध्ये, सर्व भाषांमध्ये, मानवी जीवनाच्या सर्व दशांमध्ये, आशानिराशेत, जय–पराजयात आपले पाथेय बनून राहिली आहे. आपत्काळात ती संजीवनीसारखी उपकारक ठरली, शांत काळात भौतिक पातळीवरून आपले विचार अध्यात्मिक उंचीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य तिने केले आहे....रामायणात आपल्याला महान भारताचे दृश्य दिसते. त्या वेळी केंद्रसत्ता दुर्बल होती. समाजात संभ्रम होता, परस्परांना पूरक असलेले ब्राह्मतेज व क्षात्रतेज आपआपसात भांडताना दिसत होते. अशा वेळी दशरथाकडे मुनींनी त्याचे दोन पुत्र मागितले. दशरथाने ते दिले. मग या मुनींनी त्या दोन राजपुत्रांकडून यज्ञविध्वंस करणाऱ्या, तपोवने भ्रष्ट करणाऱ्या राक्षसांचे पारिपत्य घडवून आणले. राम हा पुरुषोत्तम ठरला आणि भारताच्या आदर्श परंपरेचा स्वामी झाला. !'

ते पुढे म्हणाले, 'रामाला वनवासात जा असे सांगितले. गेल्यानंतरही राम सत्ता मिळवू शकला असता; पण त्याने तसे केले नाही...रामाचे व्यक्तिमत्त्व अपूर्व आहे. राम हा अवतारही आहे. आपल्या जीवनाच्या सर्व अवस्थांमये तो सामावलेला आहे....ग. दि. माडगूळकर हे औद्योगिक संस्कृतीच्या काळातले महाकवी...'

¤

वाजपेयी यांनी आपल्या व्याख्यानाला जी राजकीय किनार विणली ती मला आवडली नाही. तरी राजकीय कार्यकर्ते प्रत्येक गोष्टीकडे त्याच दृष्टीने पहात असल्यामुळे त्यांच्या असल्या बोलण्याला इलाज नाही; पण रामाचे त्यांनी जे परंपरागत गुणगान केले ते फारच ठराविक होते. पुराणपुरुषांविषयी हे असेच बोलावयाचे असते व श्रोत्यांनी ऐकावयाचे असते हे खरे; पण आता आपण रामकथेविषयी सुद्धा वेगळा विचार करायला हवा. मला आठवते की ना. ग. गोरे यांनी साधनेत रावणाच्या दृष्टिकोनातून रामायण—म्हणजे रावणायन-लिहिले होते. अर्थात त्या रामायणात राक्षसांचे मांडलेले चित्र बरोबर उलटे करून ते रामाचे म्हणून मांडले होते. मला वाटते आपण असाही एकदा राम बघावयास हवा, दुसऱ्यांच्या दृष्टिकोनांतून.

ते जमले नाही तर निदान रामायण तरी नीट वाचावयास हवे. तसे केले तर ध्येयवेड्या लोकांनी रामाविषयी ज्या कल्पना करून दिलेल्या आहेत त्या चूक आहेत हे तेव्हाच ध्यानात येईल. कारण रामायणातला राम हा कवीची सौंदर्यदृष्टी असलेला, शृंगाराचा राजाही होता. वनवासात गेल्यावर सीतेला चित्रकूटपर्वताचे वर्णन रसभरितपणे करून राम म्हणतो, 'याचे शिखर सर्व बाजूंनी शुभ दिसत आहे. कुष्ठ, स्थगर, पुन्नाग आणि भूर्जपत्र या वृक्षांची पाने हीच ज्यावरील आस्तरणे आहेत आणि पद्मदलांनी ज्या युक्त आहेत, अशा विषयीजनांच्या उत्कृष्ट शैय्या तू अवलोकन कर ! कमलपुष्पांच्या माला या ठिकाणी चेंगरून जाऊन इकडे तिकडे उडविलेल्या दिसत आहेत आणि त्याचप्रमाणे नाना प्रकारची फळे, विषयीजनांनी उपभोग करून टाकलेली दिसत आहेत.'

नंतर मंदाकिनीनदीचे वर्णन करताना राम म्हणतो, 'प्रिये ! ही मंदाकिनीनदी पहा ! हिचे उदक कोठे मोत्याप्रमाणे दिसत आहे...हे कृशोदरि, वायूने उडून आलेले एक आणि उदकात पुन्हा पुन्हा बुडत असलेले पुष्पसमुदाय तू अवलोकन कर. हे कल्याणि ! मनोहर शब्द करणारे आणि शुभ शब्द उच्चारीत असलेले हे चक्रवाकपक्षी वाळवंटावर बसत आहेत पहा. प्रिये ! चित्रकूट पर्वत आणि मंदाकिनीनदी यांचे दर्शन, अयोध्यानगरीतील वास्तव्यापेक्षाच नव्हे तर तुझ्या दर्शनापेक्षा अधिक सुखावह आहे. प्रिये, या मंदाकिनीनदीत तू माझ्याबरोबर स्नान कर !'

नंतर एका गुहेतील गुळगुळीत शिला पाहून राम 'तू आधी इथे बैस तर खरी' म्हणतो...तेव्हा जातीचीच सरळ असलेली सीता रामाला म्हणते 'हे रघुनंदन ! आपल्या वचनाला मला अवश्य मान दिला पाहिजे. हा मनोरथ आपल्या अंतःकरणामध्ये आज वारंवार घोळत आहे !'

एवढे बोलून ती सुंदरी बिचारी सीता शिलेसमीप गेली. तेव्हा राम, पर्वतावरील वृक्षराजी आणि भृंगराज आणि कोकिल यांचे शब्द यांकडे तिचे लक्ष वेधतो आणि म्हणतो, 'हे देवी ! श्रम झाले असता ज्याप्रमाणे तू मला अगदी चिकटून राहतेस, त्याप्रमाणे पुष्पभाराने लवलेली ही लता वृक्षाला चिकटून आहे.'

'तेव्हा त्या बोलण्यातला अभिप्राय जाणून सीता प्रियाच्या मांडीवर अगदी लगटून बसली आणि ती सीता मांडीवर बसली असता कामविकाराने युक्त झालेल्या रामाच्या मनाला आनंद देऊ लागली.'

वाल्मिकीने रामाला माणसासारखेच दाखविले आहे याचे प्रत्यंतर असे अनेक ठिकाणी येते. आता या महोत्सवात कोदंडधारी रामाचे चित्र व्यासपीठामागे लावले होते आणि रामाचे शौर्य व पराक्रम यासंबंधी वारंवार सांगितले जात होते; पण राम हा एकदा रणातून पळाला हे वाल्मीकीने मन-

पृष्ठ २१ वर

वगाड (१२)

# होऊ मुंगी-मधमाशी !

वध्या

मुंग्या, वाळवी, मधमाश्या वगैरे कीटकांचे मोठे कौतुक माणसाला कायम वाटत आलेले आहे. त्यांची एकजूट, सतत उद्योग, त्यांच्यातली कामांची वाटणी, एवढ्याश्या टीचभर जीवांनी उभी केलेली मोठमोठी वारुळे, त्यांची कौशल्यपूर्ण रचना यांची भरघोस वर्णने करणारी जीवशास्त्रज्ञांची पुस्तके वरचेवर प्रसिद्ध होत असतात. मुंग्या, वाळव्या वगैरे जमिनीत रहाणारे प्राणी शेती करतात, धान्य साठवून ठेवतात, नव्या पिढ्यांची काळजी घेतात हे आता सर्वांना माहीत झाले आहे. मधमाश्या परागकण गोळा करताना कसा नाच करतात, सूर्याच्या आकाशातील ठिकाणावरून वेळ त्यांना कळते की नाही, त्या एकमेकींना दिशा आणि अंतर कसे कळवतात याचेही बारीक निरीक्षण शास्त्रज्ञांनी केले आहे.

पण या कीटकांचे कौतुक केवळ जीवशास्त्रज्ञांपुरतेच मर्यादित आहे असे नाही. सामाजिक आणि राजकीय विचारवंतांनीही मुंग्यांच्या समाजरचनेची स्तुती अनेकवार केली आहे. मुंग्यांतील श्रम-विभाग आदर्श असतो. जी ती मुंगी तिचे नेमलेले काम बिनतक्रार आणि वक्तशीर करत असते. ती समाजाशी अगदी एकजीव झालेली असते. समाज आपल्याला काय देतो याचा विचार न करता ती आपल्या कुवतीनुसार समाजाला जे देता येईल ते देत असते. आपल्याला काम नेमून देणारा कोण, तसे करण्याचा त्याला अधिकार आहे की नाही, अधिकार असला तरी त्या कामापासून एकूण वारुळाचा नक्की फायदा होतो की नाही वगैरे प्रश्न मुंगीच्या मनातही येत नाहीत. 'नियतम् कुरु कर्म त्वम्' ही भगवंताची आज्ञा अर्जुनानेदेखील जितक्या निष्ठेने पाळली नसेल तितक्या निष्ठेने मुंगी पाळत असते.

मुंग्यांचा आणि मधमाश्यांच्या समाजाचा हा एकजीवपणा पाहून अनेक जीवशास्त्रज्ञ तर प्रत्येक मुंगी किंवा प्रत्येक मधमाशी म्हणजे निराळा प्राणी आहे असे मानतच नाहीत. त्यांच्या मते संपूर्ण वारुळ किंवा संपूर्ण पोवळे हा एक प्राणी आहे. प्रत्येक मुंगी किंवा माशी ही वारुळ या प्राण्याचा किंवा पोवळे या प्राण्याचा एक अवयव आहे. प्राण्याच्या जसे अवयवात आपसूक सहकार्य असते आणि झगडा कधीच नसतो त्याचप्रमाणे दोन मुंग्यांत आपसूक किंवा अंतःप्रेरणेने सदैव सहकारच असतो. 'समानी व आकुतिः समाना हृदयानि वः' म्हणणाऱ्या वैदिक ऋषींच्या मनात मुंगीचे किंवा मधमाशीचेच उदाहरण असावे असे म्हणता येईल.

मुंग्यांच्या समाजासारखी आदर्श समाजरचना माणसांच्या समूहांतही असावी हा विचार अर्थात आलाच. तशी आदर्शवादी अनेक स्वप्ने प्लेटोच्या काळापासून रंगविण्यात आली. ज्यात लढे नाहीत, झगडे नाहीत, विग्रह नाहीत, कोण्याही व्यक्तीचा उत्कर्ष न होता समाज मात्र संपन्न होत आहे, कोणी कोणाला आज्ञा करीत नाही, कोणी कामचुकार नाही, चोरी-अपहरण नाही असा समाज कोणाला नको असेल? परंतु, माणसाच्या इतिहासात आजपर्यंत तरी असा समाज निर्माण झालेला नाही.

## क्षणभंगुर रहा

असे का होत असावे याचाही विचार शास्त्रज्ञांनी केला आहे. यात लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, कीटकेतर प्राण्यांत अशी समाजरचना आढळत नाही. रानटी जनावरे आणि कावळे-चिमण्यांसारखे एकएकटे राहणारे प्राणी सोडाच, पण कळपाने रहाणारे आणि देशांतर करणारे जे प्राणी आहेत त्यांचेही कळप मुंग्यांच्या वारुळांसारखे एक-जीव झालेले दिसत नाहीत. यावरून असे दिसते की, कीटकांपेक्षा प्रगत प्राण्यांच्या समूहात एकसंधपणा साधला जात नाही.

कीटक हे ज्या त्या क्षणापुरते जगत असतात. त्यांचा एक क्षण दुसऱ्या क्षणाशी आयुष्याने बांधलेला नसतो. किंबहुना आयुष्य ही कल्पनाच कीटकांच्या बाबतीत उद्भवत नाही. ते त्या त्या क्षणापुरते अस्तित्वात असतात. मागच्या क्षणी पाहिलेली मधमाशी आणि आता पहात असलेली मधमाशी आपल्या लेखी तीच असली तरी मधमाशीच्या दृष्टीने एक असणे याला काही अर्थ नसतो. क्षणभंगुरता ही कीटकांच्या विषयात अतिशय टोकाला पोचलेली असते.

यासंबंधी मनोरंजक प्रयोग एका शास्त्रज्ञाने केला होता. एक कीटक-त्याला आपण टोळ म्हणू-बांबूला भोक पाडून राहतो. त्या टोळाची रीत अशी की, एखादा खाद्य पदार्थ सापडला की तो आपल्या घराशी घेऊन यायचे. भोकापासून बरोबर इंचभर अंतरावर तो पदार्थ ठेवायचा. नंतर पुढे येऊन घरात डोकावून पहायचे. हो, दुसऱ्या एखाद्या टोळाने घर बळकावले असले तर? मग तो पदार्थ उचलून घरात जायचे. या शास्त्रज्ञाने काय केले की, पदार्थ घराबाहेर ठेवून टोळ घरात डोकावयास गेला की, पदार्थ जरा दूरवर सरकवून ठेवायचा. टोळ पदार्थ ठेवल्याजागी यायचा. तिथे पदार्थ नसल्याने जरा गोंधळायचा. पदार्थ जवळच असल्याने सापडला की, तो पुनः मूळ जागी ठेवून परत घरात डोकावावयास जायचा. दरम्यान शास्त्रज्ञाने पदार्थ पुनः सरकवून थोड्या लांब अंतरावर ठेवलेला असे. हे अनेकदा झाले. टोळाला हे कळत नसे की, आपल्याला सापडलेला पदार्थ हा आपण पूर्वी आणलेलाच आहे, नव्याने सापडलेला नाही. सारांश त्या टोळाच्या स्मृतीची व्याप्ती पदार्थ ठेवल्या जागेपासून घरात डोकावून परत येण्यापर्यंतच होती.

कीटक हे असे एका क्षणापासून दुसऱ्या क्षणापर्यंत जगत असल्याने त्यांच्या अंतःप्रेरणेवर संस्कार होऊन तिचे विचारशक्तीत रूपांतर होत नाही. तसेच कीटकांच्या

ठिकाणी व्यक्तिमत्त्वही संभवत नाही; मग स्वार्थ कोठून येणार? साहजिकच कीटक–व्यक्ती स्वतःला समूहात विसर्जित करू शकते. ती इतकी की, कीटकांचा समह हाच एक प्राणी असे समजणे युक्तिसंगत ठरते. कळपात हरवून जाण्याचा कीटकाचा गुणधर्म हा असा स्मरणाच्या अभावातून निर्माण झाला आहे.

## स्मरणशक्तीचा विस्तार

कीटकांपासून अधिक प्रगत प्राण्यांकडे जसजसे जावे तसतसा स्मरणशक्तीचा विस्तार होत गेलेला आढळतो आणि मनुष्यप्राण्यात तर तो कोणत्या कोटीला पोचला आहे ते सर्वांना माहीतच आहे. साधारण सुशिक्षित माणसाला गेल्या दीड-दोन हजार वर्षांचा इतिहासही स्थूलमानाने माहीत असतो आणि गेल्या दहा-पंधरा वर्षांतील घटनांचे तर अतिशय तपशीलवार वर्णन तो करू शकतो. मनुष्याची आठवण अशी अकटोविकट विस्तार पावली आहे इतकेच केवळ नाही, तर स्वतःची आठवण पुढल्या पिढ्यांतील लोकांसाठी जपून ठेवण्यासाठी त्याचा जो आटापीटा चाललेला असतो तोही कौतुक करण्याजोगा आहे. स्वतःची मूर्ती पुढील काळात शाबूत रहावी म्हणून लोक स्वतःचे फोटो व चित्रे काढून घेतात. त्याहून महत्त्वाकांक्षी लोक पुतळे बनवून ठेवतात. त्याहूनही जबरदस्त माणसे स्वतःचे शरीर जसेच्या तसे कायम रहावे म्हणून स्वतःच्या प्रेताला रोंगणे लावून त्याचे रक्षण केले जाईल अशी व्यवस्था करतात. थोडक्यात स्मरण म्हणजे केवळ गतकाळाची आठवण इतकाच त्याचा अर्थ नाही, तर क्षणभंगुरतेला विरोधी अशा वृत्तींना स्मरण असे म्हटले पाहिजे.

आपल्या स्मरणशक्तीचे मनुष्याला अतिशय कौतुकही वाटत आले आहे. स्मृती हे मनुष्यत्वाचे मूळ आहे, स्मृतिभ्रंशाने सर्वनाश होतो ही समजूत सर्वत्र आहे. मनुष्याचे व्यक्तिमत्त्व हे त्याच्या अस्तित्वाचा एक क्षण दुसऱ्यात गुंफल्याने बनते आणि ही गुंफण गेल्या क्षणांचे भान असल्याने निर्माण होते. सारांश व्यक्तिमत्त्वाचा पाया क्षणभंगुरतेवर मिळवलेल्या विजयात आहे, म्हणजेच स्मरणशक्तीत आहे. मनुष्याच्या ठिकाणी व्यक्तिमत्त्व असल्याने त्याच्या वागणुकीविषयी अंदाज बांधता येतो. त्यातूनच विश्वास आणि व्यवहार या गोष्टी निर्माण होतात. असा विचार केल्यास मनुष्य–संस्कृतीचा सारा विकास देखील स्मरणामुळे शक्य झाला आहे असे म्हटले पाहिजे. तेव्हा स्वतःच्या स्मरणशक्तीविषयी मनुष्यजातीला वाटणारा अभिमान सार्थ आहे.

पण असे असले तरी कीटकांत आढळणारी क्षणभंगुरताही माणसाला अनेकदा आकर्षित करते. स्मरणशक्तीमुळे किंवा आठवणींमुळे आपल्या वर्तनात सुसंगती ठेवावी लागते. हे बंधन माणसाला बरेचदा नकोसे होते. आपल्या उत्स्फूर्त आणि मनमोकळ्या वागण्याला सुसंगतीने व्यवहार करण्याच्या नियमाचा अडथळा येतो असे वाटते. कित्येकदा तर इतिहासाच्या ओझ्याने आपली प्रगती कुंठित होत आहे असा त्रागाही माणसे करतात. ‘प्रगतिपथावर इतिहासाच्या अडविती शृंखला’ असे कुसुमाग्रजांनीही म्हटले आहे.

## क्षणिक जीवनाकडे घोडदौड

मुंग्या, मधमाश्या आणि त्यांच्यासारखेच इतर कीटक यांच्या समाज-जीवनाचे आकर्षण राजकीय विचारवंतांना, नेत्यांना आणि कित्येक सामान्य माणसांना कायम वाटत आले आहे, हे आपण पाहिले. कीटक अशा तऱ्हेचे समाज निर्माण करू शकतात. कारण प्रत्येक कीटक हा क्षणजीवी असतो. मनुष्यात अशा तऱ्हेची समाजरचना होणे शक्य नाही. कारण माणसाची आठवण ही तीव्र असते व त्यामुळे त्याच्या ठिकाणी व्यक्तिमत्त्व निर्माण झालेले आहे; परंतु तरी देखील काही आशावादी आणि प्रयत्नशील माणसे मनुष्य-समाज वारुळासारखा किंवा पोवळ्यासारखा जगावा म्हणून प्रयत्न करताना आढळतात.

अशा प्रयत्नशील लोकांत आपल्याकडील राजकीय नेत्यांचा समावेश केला पाहिजे. गेल्या ८–१० वर्षांतील त्यांच्या वर्तनाचा आढावा घेतला, तर या मंडळींनी स्वतःला किडामुंग्यांच्या कोटीत नेऊन बसविले आहे, हे सहज ध्यानात येईल. त्यांचे वागणे स्वार्थी, भ्रष्टाकारी, अनीतीने बरबटलेले, अत्याचारी असते वगैरे भलभलते आरोप आपण करीत आलो; परंतु ते करताना आपण त्यांच्यावर अन्याय करीत होतो, त्यांना किड्या–मुंग्यांचा आदर्श समाज या प्राचीन देशात निर्माण करावयाचा आहे आणि त्यासाठी स्वतःचे उदाहरण ते प्रजेला घालून देत आहेत, या उदात्त वस्तुस्थितीकडे आपण दुर्लक्ष केले.

मधु लिमये, राजनारायण, बहुगुणा आणि बाबू जगजीवनराम या सज्जनांनी त्या त्या क्षणापुरते जगण्याचा उत्तम धडा आपल्याला दिला आहे. बहुगुणा इंदिरा काँग्रेसमध्ये सामील झाले तेव्हा त्यांना अनेकांनी सल्ला दिला होता की, निवडणुका होऊन जाताच तुम्हाला कवडीइतकी किंमतही उरणार नाही. तुम्ही पूर्वी इंदिरा गांधींना शिव्या घातल्या आहेत, त्या तुमचा अपमान केल्याखेरीज रहाणार नाहीत; पण बहुगुणा काय म्हणाले? "दोन-तीन महिन्यांनंतरचा विचार किंवा दोन-तीन महिन्यांपूर्वी मी काय म्हणत होतो याचा विचार मी करीत नाही. माझ्या आठवणीची त्रिज्या साधारण ५ सेकंदांइतकीच आहे. माझ्या आध्यात्मिक प्रगतीचा तो दाखला आहे." बहुगुणांचे अध्यात्म इतके प्रगत आहे की ‘आत्मौपम्य’ त्यांच्या अंगी बाणले आहे. त्यांना वाटले की बाईंचे स्मरणही पाच सेकंदांइतकेच संकुचित झाले असेल.

बाबू जगजीवनराम यांनी स्मरणसाखळीतून स्वतःची सुटका करून घेतली त्याला आता एक तप लोटले आहे. त्या वेळी ते इन्कमटॅक्सची रीटर्नस् भरावयास विसरले होते. मुंग्या आणि मधमाश्यांचा आदर्श तेव्हाच्या विरोधी पक्षीयांनी ठेवलेला नसल्यामुळे या स्मरणक्षयाबद्दल बाबूजींचे अभिनंदन करावयाचे सोडून उलट निंदेचा ठराव मांडला; परंतु श्रीमती गांधी, त्यांचा पक्ष आणि साम्यवादी दले ही पहिल्यापासूनच मुंगी-पंथाचे वाटसरू असल्याने तो ठराव हाणून पाडला. त्यानंतर मधुमक्षिका-पिप्पीलिका पंथाचा प्रसार इतका झाला आहे की, बाबूजींची १९६९ साली निंदा करणाऱ्यांनी त्यांना आपला नेता बनविले. अलीकडे तर जगजीवनरामजी पिप्पीलिका–मार्गात सिद्धच झाले आहेत असे म्हटले पाहिजे. कारण आपण सकाळी काय बोललो ते ते दुपारी विसरलेले असतात.

## आपणासारिखे करिती

सर्व राजकीय नेत्यांना व्यापून राहिलेला हा पिप्पीलिकापंथ तुम्हा–आम्हा अज्ञ

जनांच्यात पसरवून आपले गोमटे करावे असा सुविचार आपल्या राज्यकर्त्यांच्या मनात आल्यास नवल नाही. महात्मे हे जगाच्या उन्नतीसाठीच अवतरलेले असतात. सर्व भारतीयांना पिप्पीलिका–मार्गाने पुढे नेण्यासाठी भारतीय राजकारण्यांनी ज्या दीर्घकालीन योजना आखल्या आहेत त्या पाहता प्रजेच्या कल्याणासाठी आपल्या बुद्धीचे क्षणभंगुरत्व सोडण्याचा महान् त्याग त्यांनी केला आहे हे कळून गहिवरून येते.

लोकांना वाटते महागाई सरकारच्या गैरकारभाराने होते; परंतु यात गैरकारभाराचा काही भाग नाही. महागाई वाढत चालली की, दीर्घकालीन योजना फोल ठरतात. माणूस फक्त आला दिवस कसा ढकलायचा इतकाच विचार करू लागतो. क्षणभंगुरता त्याच्या बुद्धीत घर करू लागते. दंगे–धोपे, खून–मारामाऱ्या, रेल्वेचे आणि मोटारचे अपघात यांचाही हेतु तोच आहे, उद्यांचा विचार करू नका. आताचा, या क्षणाचा विचार करा. त्या क्षणाला जगण्यातील आनंद मधमाशी फुलातला मध जसा कडकडून पिते तसा प्या ! हा महान् आध्यात्मिक संदेश या सगळ्या गोष्टींतून आपल्याला आपले नेते देत असतात.

आपल्या शिक्षणाचे गरगरीत वाटोळे नवनव्या सुधारणा सुचवून सरकारने केले आहे, असे कित्येक अडाणी लोक म्हणतात; परंतु मधुमक्षिका–मार्गाचे शिक्षण असेच असायचे हे ते विसरतात. पूर्वी परीक्षेत प्रश्नांची निबंधवजा उत्तरे असत. निरनिराळे परिच्छेद पाडायचे, प्रत्येक परिच्छेदात एकाच विचाराचा निरनिराळ्या उदाहरणांनी विचार करायचा, परिच्छेद एकामागून एक सुसंगत पद्धतीने उलगडत गेले पाहिजेत अशी रीत असे. ही दीर्घविचारपद्धत मक्षिका–मार्गात बसत नाही. म्हणून मग जागा भरा, खरे की खोटे ते सांगा, जोड्या जमवा अशा तऱ्हेचे क्षणजीवी प्रश्न आले. वर्षभराची सारी कसरत या प्रश्नांची उत्तरे घोटून घेण्यात खर्च होऊ लागली.

### होऊ मुंगी–मधमाशी

मनुष्याची स्मृती तीक्ष्ण असण्याचे एक कारण म्हणजे माणसाजवळ भाषा असते. अखेर आठवण म्हणजे काय? जी गोष्ट आपल्यासमोर नाही तिच्याविषयी विचार करण्याची कुवत. ही कुवत भाषेखेरीज पुरेशी वाढणार नाही. तेव्हा माणसाचे मुंगीत परिवर्तन करायचे असेल तर त्याच्याजवळची भाषा काढून घेतली पाहिजे. तसा एक प्रयत्न आणीबाणीच्या काळात झाला होता हे, आमचे अजून कीटाणूत रूपांतर झाले नसल्याने, आम्हाला आठवते. तथापि आता त्याहून कावेबाज उपाययोजना करण्यात येत आहे. ती म्हणजे शब्दांना नक्की अर्थच उरू द्यायचे नाहीत. आता 'रीकॉल' हा शब्दच बघा ना! आपण तो जयप्रकाशांकडून शिकलो. (आठवतात ना, जयप्रकाशजी?) त्यांनी अर्थ सांगितला होता की, जनतेने आपल्या प्रतिनिधीचे प्रतिनिधित्व काढून घेणे म्हणजे रीकॉल. परवा आपले लाडके नेते संजयजी यांनी सांगितले की, विधानसभांची बरखास्ती म्हणजेच रीकॉल. आता शब्दांच्या अर्थाचे असे गुंतवळ झाले की काय होणार? भाषेचा वापरच सोडून द्यावा लागणार!

आपल्या देशातील माणसांचे असे कीटकात रूपांतर करण्याचा महनीय प्रयत्न आपल्या राजकीय नेत्यांनी, मग ते कोणत्याही पक्षाचे असोत, चालवला आहे. त्या प्रयत्नाचा आणखी एक भाग म्हणजेच साऱ्या देशाला एक औरस–चौरस वारूळ किंवा झोपडपट्टी बनविणे. त्या दिशेने आपली पावले आपल्या नकळत किती झपाट्याने पडत आहेत याचे निराळे वर्णन करण्याची जरुरी नाही, प्रत्येकाच्या अनुभवाला येणारी ती गोष्ट आहे. पिप्पीलिका आणि मधुमक्षिका-पंथाचे अंतिम ध्येय ते आहे!

□

# राज्यसभा

## कणाहीन विरोध

वा. दा. रानडे

नऊ राज्यांच्या विधानसभा बरखास्त करण्याच्या निर्णयाला इंदिरा काँग्रेसने राज्यसभेत बहुमत नसता मंजुरी मिळविली, त्यामुळे आमच्या विरोधी पक्षांना कणा आहे की नाही याचीच शंका येऊ लागली आहे. "हा फोडाफोडीने व कारवाया करून मिळविलेला विजय आहे." अशी टीका विरोधी पक्षाचे नेते लालकृष्ण अडवानी यांनी सभात्याग करताना केली. सत्तारूढ पक्षाच्या कारवाया कितीही निषेधार्ह असल्या तरी त्यांना बळी पडण्यात विरोधी पक्षाची जी नामुष्की झाली ती कोणत्याही दृष्टीने समर्थनीय तर नाहीच उलट लाजिरवाणी आहे. आमच्यामागे थोडे सभासद असले तरी हरकत नाही; पण ते पक्षाच्या धोरणाशी व तत्त्वांशी एकनिष्ठ असतील. ते फुटणार नाहीत, पक्षाचा आदेश न मानता सरकारच्या बाजूने मत देणार नाहीत अशी ग्वाही आपल्या किती सभासदांबद्दल विरोधी पक्षांचे नेते देऊ शकतील? पक्षनिष्ठा व तत्त्वनिष्ठा यांची जागा पक्षांतर व संधिसाधुपणा यांनीच घेतली असल्याचे आज प्रामुख्याने दिसून येत आहे.

या प्रश्नावर इंदिरा गांधींचा पक्ष प्रथमपासून जे डावपेच खेळला ते पाहण्यासारखे आहेत. राज्यसभेत विरोधी पक्षांचे बहुमत आहे तेथे ते आपली अडवणूकच करणार, महत्त्वाची बिले व ठराव विशेषतः घटनादुरुस्ती पास करून घेणे आपणास अवघड जाईल याची इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना कल्पना होती म्हणून लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासूनच फोडाफोडीचे आपले बळ वाढविण्यास त्यांनी सुरुवात

केली. राज्यसभेच्या एकूण जागा २४४. त्यापैकी ९ जागा रिकाम्या होत्या. म्हणजे बाकीच्या २३५ पैकी सर्व सभासद उपस्थित राहिले असे गृहीत धरले तरी बहुमतासाठी इंदिरा काँग्रेला कमीत कमी ११८ सभासदांच्या पाठिंब्याची गरज होती. इंदिरा काँग्रेसचे सभासद त्या वेळी फक्त ७५ होते. राज्यसभेचे अधिवेशन सुरू झाल्याबरोबर सुरुवातीलाच हा ठराव चर्चेला आला असता तर तो फेटाळला जाण्याची बरीच शक्यता दिसत होती. तीस जानेवारीला राष्ट्रपतींचे भाषणाबद्दल आभार मानणाऱ्या ठरावात विरोधी पक्षांचे सभासद भूपेश गुप्ता यांनी सुचविलेली एक दुरुस्ती ८० विरुद्ध ७५ मतांनी पास झाली होती. ज्या राज्यात विरोधी पक्षांची सरकारे अधिकारावर आहेत तेथे मोठ्या प्रमाणावर पक्षांतर घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत आणि संघराज्य तत्त्वाचा उघड भंग करून अशा विधानसभा बरखास्त करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. घटनेची व लोकशाही संकेतांची अशी पायमल्ली करणाऱ्या प्रयत्नांना सरकार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उत्तेजन देणार नाही असे आश्वासनही राष्ट्रपतींच्या भाषणात दिलेले नाही, याबद्दल या उपसूचनेत चिंता व्यक्त करण्यात आली होती.

त्यानंतर मार्चमध्ये राज्यसभेचे अंदाजपत्रकी अधिवेशन सुरू झाले, तेव्हा विरोधी पक्षांनी विधानसभाविसर्जनाच्या निर्णयावर चर्चा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसचे ए. जी. कुलकर्णी यांनी याबाबत ठराव मांडला होता. विधानसभा बरखास्त करण्याचा राष्ट्रपतींचा जाहीरनामा मागे घेण्यात यावा अशी त्यात मागणी केली होती; पण या जाहीरनाम्यास न्यायालयात आव्हान देण्यात आले असल्याने हा विषय न्यायप्रविष्ट झाला असून त्यावर चर्चा करता येणार नाही असा निर्णय सभापती हिदायतुल्ला यांनी दिला. ज्या राज्यांनी न्यायालयात अर्ज केले आहेत त्यांची नावे ठरावातून वगळून तो मांडण्याची तयारी कुलकर्णी यांनी दर्शविली होती; पण ती सूचनाही मान्य झाली नाही. सरकारमागे राज्यसभेत बहुमत नसल्याने हा ठराव त्या वेळी चर्चेला येणे त्याच्या दृष्टीने सोयीचे नव्हतेच.

दरम्यान फोडाफोड करून आपले बळ वाढविण्याचे इंदिरा काँग्रेसचे प्रयत्न चालूच होते. काँग्रेस, जनता पक्ष व अपक्षांमधून २५ सभासद फोडून सत्तारूढ पक्षाने आपले बळ १०० पर्यंत वाढविले. त्याशिवाय द्र. मु. क. व मुस्लीम लीग या मित्र पक्षांच्या आठ सभासदांचा सरकारला पाठिंबा होता तरीही बहुमतासाठी आणखी किमान दहा सभासदांचा पाठिंबा हवा होता. तो मिळविण्याचा प्रयत्न इंदिरा काँग्रेसने केला आणि बारा सभासदांचा पाठिंबा मिळविला असे मतदानाच्या आकड्यांवरून दिसते. भूपेश गुप्ता यांचा ठराव ९६ विरुद्ध १२० मतांनी फेटाळला गेला. एकूण २१६ सभासदांनी मतदानात भाग घेतला. ठरावावर कोणी तटस्थ राहिल्याची नोंद नाही. त्या अर्थी २१६ सभासदच उपस्थित होते. गैरहजर १९ सभासदांमध्ये १८ विरोधी पक्षांचे व फक्त १ इंदिरा काँग्रेसचा मित्रपक्ष द्र. मु. क. चा होता. इंदिरा काँग्रेसचा त्यात एकही नव्हता. एवढ्या महत्त्वाच्या प्रश्नावरील मतदानाच्या वेळी जनताचे दिनेशसिंग, श्रीमती विजया राजे शिंदे, काँग्रेसचे के. सी. पंत, युनुस सलीम गैरहजर रहावेत याचे आश्चर्य वाटते!

पक्षांतराला आळा घालण्याची आवश्यकता राज्यसभेतील मतदानाने अधिकच तीव्रपणे जाणवली; पण यासंबंधीचे बिल लौकर मांडण्याची तातडी इंदिरा काँग्रेसला वाटत असल्याचे दिसत नाही. राज्यसभेत आपले निर्णायक दोनतृतीयांश बहुमत प्रस्थापित होईपर्यंत इंदिरा काँग्रेस या बाबतीत घाई करील असे वाटत नाही.

**राज्यसभेने विधानसभा-विसर्जनास मंजुरी देण्याचे नाकारले असते तर घटनात्मक पेच**प्रसंग निर्माण झाला असता का? राष्ट्रपतींच्या जाहीरनाम्यास दोन्ही गृहांची मंजुरी न मिळाल्याने तो रद्द ठरला तरी विसर्जित केलेल्या विधानसभा निवडणुकीशिवाय पुन: अस्तित्वात आणता येत नाहीत. तेव्हा जाहीरनामा रद्द ठरूनही प्रत्यक्षात काही फरक पडला नसता. फार तर निवडणुकांत प्रचारासाठी विरोधी पक्षांना त्याचा उपयोग करता आला असता.

राज्यसभेने विधानसभा–बरखास्तीस मंजुरी दिल्याने दोन गृहांतला संघर्ष टळला; पण संघर्षाचे प्रसंग येऊच नयेत यासाठी काय करता येईल? राज्यसभेसंबंधात मी पूर्वी उपस्थित केलेलेच दोन प्रश्न मला पुन: उपस्थित करावेसे वाटतात. पहिला प्रश्न राज्यसभा आवश्यक आहे का? राज्यसभेचे सभासद राज्यांच्या विधानसभांनी निवडलेले असतात. राज्यांच्या हितसंबंधांची जपणूक त्यांनी करावी हा त्यामागील उद्देश; पण राज्यसभेचे आतापर्यंतचे कामकाज पाहिले तर सभासदांनी या उद्देशाने चर्चा केलेली फारशी आढळत नाही. संसदीय चर्चेत राज्यसभेने काही वैशिष्टयपूर्ण भर घातली असे किती बिलांच्या बाबतीत म्हणता येईल? लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या किंवा तिकिट न मिळालेल्या कार्यकर्त्यांना राज्यसभेवर पाठविले जाते. एक राजकीय सोय याच उद्देशाने मुख्यत: राजकीय पक्ष या सभागृहाकडे पाहतात. तेव्हा राज्यसभेची खरोखर काही आवश्यकता नाही असे मला वाटते आणि ती ठेवावयाचीच असेल तर लोकसभा व विधानसभांच्या निवडणुकीनंतर लागलीच तिचे सभासद निवडले जावेत. म्हणजे लोकसभा व विधानसभांत राजकीय प्रवाहांचे जे प्रतिबिंब असेल तेच राज्यसभेत. त्यात विसंवाद राहणार नाही आणि दोन गृहात संघर्षाचे प्रसंगही निर्माण होणार नाहीत.

□

# अस्वस्थ आसाम

**लेखांक पाचवा** **विनय सहस्रबुद्धे**

## बंगाली भाषी नागरिक, राजकीय पक्ष व रा. स्व. संघाचा आंदोलनातील सहभाग

आसामातील आंदोलनाबाबतचा हा पाचवा लेखांक लिहीत असतानाच असमिया–बंगाली संघर्षाने गंभीर वळण घेतल्याचे दर्शविणाऱ्या अनेक घटना घडत आहेत. त्यात पुन्हा पक्षीय राजकारण घुसल्याने या प्रश्नाची गुंतागुंत वाढली आहे.

प. बंगाल इंदिरा काँग्रेसचे एक नेते श्री. सुब्रत मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली आसामची आर्थिक नाकेबंदी करण्याचे जे प्रकार प. बंगालमध्ये सुरू आहेत ते तर दुर्दैवी आहेतच; पण या नाकेबंदीचे पंतप्रधान श्रीमती गांधींनी लोकसभेत जे समर्थन केले आहे ते अधिक दुर्दैवी आहे. ' आसामात तेलाची शुद्धीकरणकेंद्रे व पंपिंग स्टेशनवर निरोधने सुरू असल्याने सर्व देश अडचणीत आला आहे व प. बंगालमधील आंदोलन हे त्याची केवळ प्रतिक्रिया आहे ' असे सांगून पंतप्रधान म्हणतात की, ' माझे सरकार व माझा पक्ष अशा नाकेबंदीच्या विरुद्ध आहे; पण मी काही करू शकत नाही ! तरुणांना ' थोपविणे किती कठीण आहे हे तुम्ही जाणताच ! ' याच निवेदनात इंदिरा गांधींनी या आंदोलनामागे रा. स्व. संघाचा हात असल्याचे सांगून विद्यार्थीनेते तडजोडीस तयार होते; पण इतरांनी त्यांना फिरविले असाही आरोप केला आहे.

पंतप्रधान श्रीमती गांधींच्या या निवेदनातून त्या आसामच्या प्रश्नाला निखळ राजकीय रंग देऊ इच्छितात हे स्पष्ट झाले आहे. एकीकडे ' देशाच्या एकात्मतेविषयी मला अन्य कोणी शिकवायला नको ' असे सांगताना ' तरुणांना कोणी थोपवू शकत नाही ' असा हतबलतेचा खोटा आव आणणाऱ्या पंतप्रधान या संपूर्ण प्रश्नाचा राजकीय उद्दिष्टांसाठी वापर करीत आहेत ही अत्यंत खेदाची बाब आहे. इंदिरा गांधी आपल्याच पक्षाच्या तरुणांना साधे थोपवू देखील शकत नाहीत, यावर शेंबडे पोर देखील विश्वास ठेवणार नाही. या प्रश्नाला राजकीय रंग देऊन पंतप्रधानांना एका दगडात दोन पक्षी मारायचे आहेत. एकीकडे, ' यापुढे आंदोलन चालू ठेवलेत तर त्याला नाकेबंदीने उत्तर दिले जाईल ' असा गर्भित इशारा आंदोलन करणाऱ्या असमियांना द्यायचा आहे तर दुसरीकडे ' आसामातील बंगाल्यांबद्दल आपल्याला अधिक कळवळा ' असल्याचा देखावा करून मार्क्सवादी कम्युनिस्टांना काटशह द्यायचा आहे. आपल्या या दोन मर्यादित फायद्यांसाठी पंतप्रधान आसामचे आंदोलन बदनाम करीत आहेत, आसामच्या मूळ समस्यांची घोर उपेक्षा करीत आहेत व त्याहीपेक्षा भयानक म्हणजे पंतप्रधान इंदिरा गांधी आपल्या प्रश्नाचा राजकारणातीत विचार करतील, या असमियांच्या मनातील विश्वासाला तीव्र धक्का देत आहेत.

श्रीमती गांधींनी या आंदोलनामागे संघ असल्याचे सांगून आंदोलनाकडे पाहण्याचा राजकीय दृष्टिकोन अधिक स्पष्ट केला आहे. पूर्वी गृहमंत्र्यांनी केलेल्या निवेदनात संघाचा नव्हे तर सी. आय. ए. चा उल्लेख होता. पुढे तोही वगळण्यात आला. तात्पर्य, सरकारला या आंदोलनामागे कधी सी. आय. ए. चा तर कधी संघाचा भास होतोय. दुर्दैवाने आंदोलनामागे उभी असलेली लक्षा-

वधी सामान्य जनांची खंबीर लोकशक्ती मात्र डोळे असून दिसलेली नाही.

आसामात अन्नधान्ये वा अन्य वस्तू नेणारे ट्रक्स व मालगाड्या अडविण्याचे प. बंगालमध्ये झालेले प्रयत्न किंवा आसामातील विद्यार्थ्यांच्या निषेधार्थ कलकत्त्यात कॉलेजविद्यार्थ्यांनी पाळलेला बंद, या घटना आसाम आणि प. बंगाल यांच्यातील वैमनस्य वाढवीत असल्याने त्या निश्चितच चिंताजनक आहेत; पण असे असले तरी त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. या सबंध आंदोलनाकडे पाहाण्याचा बंगाली भाषी मंडळींचा दृष्टिकोन, या आंदोलनाची कलकत्त्याच्या वर्तमानपत्रांनी केलेली बदनामी आणि आसामात राहूनही काचारवासी बंगाल्यांनी केलेला सवता सुभा या गोष्टी जाणून घेतल्या की कलकत्त्यातील घटनांबाबत नवल वाटत नाही.

सतत सहा महिने आसामात सुरू असलेल्या आंदोलनापासून काचार जिल्हा अलिप्त असल्याचा उल्लेख याआधीच्या लेखांकात आला आहेच. सिल्चर हे या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण गौहातीपासून सुमारे चारशे कि. मी. अंतरावर आहे. गौहातीहून रात्रीच्या गाडीने निघालात की सकाळी अकरा वाजेपर्यंत तुम्ही सिल्चरला पोचता. लुमडिंग, बदरपूर इ. गावांवरून जाणारा हा मीटरगेज रेल्वेमार्ग नयनरम्य निसर्गसौंदर्याचं दर्शन घडवीत तुम्हाला सिल्चरला घेऊन जातो. सिल्चरला जाताना हाफलाँग हिल नावाचं स्टेशन सोडल्यावर हरांगाजाओपर्यंत घसरगुंडीवरून घसरावी तशी आगगाडी घसरत जाते, तर सिल्चरहून परताना दम खात, धापा टाकीत प्रचंड चढ चढते. डोंगरदऱ्यांच्या अंगाखांद्यावरून हा मार्ग जातो तेव्हा वळणागणिक निसर्गसौंदर्याचा नवनवा साक्षात्कार घडतो. चित्रपटातली दृश्ये बदलावीत तसे समोरचे देखावे बदलतात.

गौहाती ते सिल्चर दरम्यान धावणाऱ्या या गाडीस 'बराक व्हॅली एक्स्प्रेस' असं नाव देण्यात आलं आहे. गाडीच्या या नावातच असमिया-बंगाली स्पर्धेची चुणुक दिसते. कारण बराक ही काही फार मोठी नदी नाही किंवा ब्रह्मपुत्रेसारखे तिचे खोरेही नाही. फार काय पण आपल्या भीमा, कृष्णा इ. नद्याही बराकपेक्षा खूप मोठ्या आहेत; पण बराक ही बंगाल्यांची नदी आहे! असमियांच्या ब्रह्मपुत्रेची 'ब्रह्मापुत्रा व्हॅली' असते तर मग बराकची व्हॅली का नको? परिणामतः प्रत्यक्षात व्हॅली असो नसो, बंगाल्यांनी 'बराक व्हॅली एक्स्प्रेस' असे नामकरण करवून घेतले.

ही बराक नदी ज्या काचार जिल्ह्यात वाहते त्या काचार जिल्ह्यात सिल्चर आणि करीमगंज असे दोन तालुके आहेत. यापैकी करीमगंज हा फाळणीपूर्वी सिल्हट जिल्ह्याचा भाग होता. सिल्हट जिल्हा पाकिस्तानात जायचा की भारतात, हे ठरविण्यासाठी सार्वमत घेतले गेले व त्यात अंतर्गत संघर्षामुळे हिंदूंनी भाग घेतला नाही. परिणामतः हिंदू बहुसंख्य असूनही सिल्हट पूर्वपाकिस्तानचा भाग झाला हा इतिहास सर्वश्रुत आहेच. आपल्याच चुकीमुळे ज्यांचा जिल्हा पूर्व पाकिस्तानात गेला, त्या सिल्हटवासी हिंदू बंगाल्यांपैकी बहुसंख्यांनी फाळणीनंतर सिल्हट सोडून काचार जिल्ह्यात आश्रय घेतला. सिल्हटमध्ये आल्यावर आपल्याला बंगालचा भास होतो तो याच बंगाल्यांच्या बहुसंख्येमुळे.

सिल्चरमध्ये सुमारे चार-पाच बंगाली पुढाऱ्यांना मी भेटलो. या सर्वांनीच, आसामच्या आंदोलनाची माहिती घेताना काचार जिल्ह्यातील बंगाल्यांचे मत जाणून घेण्यासाठी मी खास सिल्चरला आलो, याबद्दल समाधान व्यक्त केलं. या सर्वांशी गप्पा मारल्यानंतर, सामान्य नागरिकांना त्यांची मतं विचारल्यावर एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली की बाकी काही असो, बंगाल्यांनाही त्यांची अशी काही बाजू आहे, ज्यात तथ्य आहे असे काही मुद्देही आहेत.

## दुसरी बाजू

इथले बंगाली लोक म्हणतात त्याप्रमाणे आसाम आंदोलनाच्या 'चित्राची दुसरी बाजू' काचार जिल्ह्यात पहायला मिळते. मुळात या आंदोलनामागे प्रचंड संख्येने आसामात आलेल्या घुसखोरांची खरीखुरी समस्या आहे हेच मुळी अनेक बंगाली नेत्यांना अमान्य आहे. त्यांच्या मते, तमाम बंगाल्यांना हाकलून देण्यासाठी आणि नंतर भारताबाहेर फुटून निघण्यासाठी आसामातील सध्याची चळवळ सुरू आहे.–'आपल्याच राज्यात अल्पसंख्य बनण्याची आपल्यावर पाळी येईल.' जशी जी भीती असमिया जनता व्यक्त करीत आहे ती निराधार असल्याचे बंगालीभाईंना वाटते. आपली ही भीती व्यक्त करताना आसामचे नेते नेहमी त्रिपुरा व सिक्कीमचे उदाहरण देतात. या दोन्ही राज्यांत मूळच्या स्थानिक लोकांपेक्षा अनुक्रमे बंगाली भाषी व नेपाळी बहुसंख्य आहेत. त्रिपुराचे मुख्यमंत्री नृपेंद्र चक्रवर्ती आणि सिक्कीमचे नरबहादूर भंडारी दोघेही मुळात त्या त्या प्रांतातले नाहीत. श्री. चक्रवर्ती बंगाली आहेत तर श्री. भंडारी नेपाळी; परंतु असमियांची 'अल्पसंख्या बनण्याबाबची'–भीती त्रिपुराच्या उदाहरणाने स्पष्ट होणार नाही. परतीच्या प्रवासात गाडीत गप्पा मारताना एक बंगाली डॉ. सेन यांनी सांगितलं की, त्रिपुरात बंगाल्यांचे लोंढेच्या लोंढे आले याला कारण म्हणजे त्रिपुराच्या देवबर्मन राजांनी बंगाल्यांना आपल्या राज्यात येऊन स्थायिक होण्यास सतत प्रोत्साहन दिलं, हे होय. प्रत्यक्ष तत्कालीन राजवटीच्याच प्रोत्साहनाने बंगाली त्रिपुरात आले, येत गेले व त्यामुळेच मूळच्या त्रिपुरी समाजाची लोकसंख्या पाच लाखच राहिली तर बंगाली १५ लाख झाले. 'थोडक्यात म्हणजे, त्रिपुराच्या नेमकी उलट स्थिती आज आसामात असताना, आमच्यापेक्षा बंगाल्यांची लोकसंख्या वाढेल या आसामातील नेत्यांच्या युक्तिवादात दम नाही.' असे अनेक बंगाली नेत्यांनी मला सांगितले.

बंगाली घुसखोरांची समस्या जर अनेक वर्षांची जुनी आहे तर याआधीच आसामच्या जनतेने या प्रश्नावर आंदोलन का नाही केले? तेव्हा आसामचे सगळे नेते 'झोपले' होते काय? इ. प्रश्नही बंगाली भाषीयांकडून विचारले जातात. त्यांच्या मते आसामात आलेले तथाकथित घुसखोर हा असमियांच्या निष्काळजीपणाचा किंवा अ–जागृततेचा परिणाम आहे, त्याचे बरेवाईट परिणाम त्यांनी भोगलेच पाहिजेत.

बंगाली लोक आसामातील जनतेवर वर्चस्व गाजविण्याचा, आपली भाषा त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न करतात इ. गोष्टी हा असमियांचा खोटा प्रचार असल्याचे बंगाली नेते सांगतात. 'असमिया लोक मुळातच अगदी सामान्य आहेत हा काही आमचा दोष नाही.

कलाकौशल्याची कामे, शिक्षण, शेतीच्या सुधारित पद्धती इ. सर्वच बाबतीत आमच्यापेक्षा असमिया मागे आहेत. आम्ही काही त्यांना मुद्दाम मागे ठेवले नाही, ते मागे पडत राहिले त्याला कोण काय करणार ?' असा सुशिक्षित बंगाली भाषीमंडळींचा सवाल आहे.

सिल्चरमधील एकूण बंगालीभाषिकात हिंदू बहुसंख्य आहेत. त्यामुळे बंगाल्यांची बाजू मांडता मांडता नकळत हिंदूंची बाजूही हिंदू बंगाली नेते स्पष्ट करतात. शिवाय एकीकडे आंदोलनावर टीका करीत असतानाच दुसरीकडे आपण भारताचे वैध नागरिक कसे आहोत व भारतात राहणे हा आपला हक्क कसा आहे, हे मुद्देही मांडले जातात. त्यामुळेच मानस चौधरी या एका बंगाली पत्रकाराने मला स्पष्टच विचारले, 'बांगला देशात जर आम्हा हिंदू बंगाल्यांना सुखाने जीवन जगता येत नसेल तर आम्ही जायचे कुठे ? अखेर भारतात परतणे आणि स्थायिक होणे हा हिंदूंचा हक्कच आहे. भारत हे हिंदूराष्ट्र कदाचित नसेल; पण ती हिंदूंची मातृभूमी नक्कीच आहे. त्यामुळे, 'जगातल्या कुठल्याही देशातून केव्हाही, कधीही येणाऱ्या हिंदूंना स्वीकारणे व त्यांचे पुनर्वसन करणे ही भारत सरकारची जबाबदारी आहे' असेही श्री. चौधरींनी सांगितले. शिलाँगच्या 'शिलाँग टाइम्स' या साप्ताहिकाचा संपादक म्हणून काम करणाऱ्या या तरुण, उमद्या पत्रकाराने मांडलेला आणखी एक मुद्दा नोंद घेण्यासारखा आहे. या पत्रकाराच्या सांगण्यानुसार भारतात राहण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही परकीय नागरिकाला सहा महिने भारतात वास्तव्य केल्यानंतर नागरिकत्व मिळू शकते अशी घटनात्मक तरतूद आहे. अशा स्थितीत वीस पंचवीस वर्षे आसाम व ईशान्य भारतात राहिलेल्या बंगाल्यांना भारत सरकारने का म्हणून हाकलून द्यावे ?

या पत्रकाराच्या सांगण्यानुसार भारतात राहण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही परकीय नागरिकाला सहा महिने भारतात वास्तव्य केल्यानंतर नागरिकत्व मिळू शकते अशी घटनात्मक तरतूद आहे. अशा स्थितीत वीस-पंचवीस वर्षे आसाम व ईशान्य भारतात राहिलेल्या बंगाल्यांना भारत सरकारने का म्हणून हाकलून द्यावे ?

आसाम प्रदेश लोकदलाचे अध्यक्ष आणि एक माजी मंत्री बॅ. गुलाब उस्मानी यांचीही मी सिल्चरमध्ये भेट घेतली. आसामात मोठ्या संख्येने बांगलादेशी घुसखोर आले आहेत हा मूळ मुद्दाच मान्य करण्यास बॅ. उस्मानी तयार नाहीत. 'आज आसामात जे बंगालीभाषी आढळतात ते प्रामुख्याने निर्वासित म्हणून आलेले व नंतर इथे स्थायिक झालेले असे आहेत. त्यांची संख्या फार मोठी नाही व त्यामुळे भारत सरकारने त्यांना स्वीकारले पाहिजे' असे बॅ. उस्मानींना सांगितले. आसामातील सध्याच्या आंदोलनाचे 'उग्र राष्ट्रवाद्यांची चळवळ' या शब्दात वर्णन करून बॅ. उस्मानी म्हणाले, या चळवळीमागे डाव्या विचारांची पीछेहाट व्हावी व प्रस्थापित उजव्या प्रतिगामी शक्तींना धोका निर्माण होऊ नये हे दोन हेतू आहेत. जमीनदार, सावकार व व्यापाऱ्यांचा या चळवळीला पाठिंबा आहे तो यामुळेच. बंगाल्यांच्या 'आमरा बंगाली' चळवळीवरही बॅ. उस्मानी यांनी टीका केली. शेवटी, रा. स्व. संघ आसामातील चळवळीला 'हिंदू विरुद्ध मुस्लिम' असे स्वरूप देण्यासाठी प्रयत्नशील आहे,' असेही बॅ. उस्मानी यांनी सांगितले.

सिल्चरचेच रहिवासी आणि काँग्रेस, जनता, लोकदल व आता पुन्हा इंदिरा काँग्रेस असा प्रवास करून आलेले एक तरुण बंगाली मुस्लिमनेते श्री. अल्तफ हुसेन यांनाही मी भेटलो. बॅ. उस्मानीं-प्रमाणेच यांनीही बंगाली घुसखोरांची समस्या हा एक Non-issue असल्याचे ठासून सांगितले. 'पण मग आसामच्या लोकसंख्येत जी अनैसर्गिक वाढ दिसते तिचे कारण काय ?' या प्रश्नाचेही उत्तर बॅ. उस्मानींप्रमाणेच हुसेनसाहेबांनाही देता आले नाही. अर्थात हुसेन-साहेब घुसखोरांची समस्या केवळ नाकारूनच थांबले नाहीत. ते पुढे म्हणाले, 'बांगला देशातून लोक भारतात येतीलच कशाला ? इथे साखर, रॉकेल इ. जीवनावश्यक वस्तूही मिळत नाहीत, तिकडे त्या मुबलक मिळतात. त्यामुळे सुखासुखी स्वदेश सोडून भारतात कोण येईल ? माझ्या माहितीप्रमाणे बांगलादेशातून भारतात नव्हे तर उलट भारतातून बांगला देशात घुसखोरी सुरू आहे !' हुसेनसाहे-बांच्या या 'दिव्य-ज्ञानाने' मी चक्रावून जात असतानाच हुसेन यांनी आणखी सांगितले. भारतात आलेल्या सर्व बंगाली मुस्लिमांना स्वीकारणे ही भारत सरकारची नैतिक जबाबदारी आहे. नेहरू—लियाकत करार किंवा इंदिरा-मुजीब करार भारत सरकार अमान्य करू शकणार नाही. 'घुसखोर जर कोणी असतील तर ते प्रामुख्याने हिंदू असल्याने इतःपर त्यांना भारताचे नागरिकत्व देणे सरकारने थांबविले पाहिजे.' असेही त्यांनी सांगितले.

चर्चेच्या ओघात हुसेन यांच्या राजकीय कर्तृत्वाचाही विषय निघाला. सुरुवातीलाच त्यांनी 'श्रीमती गांधी याच अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणकर्त्या असल्याचे आपले पूर्वीपासून मत आहे व म्हणूनच आज आपण त्यांच्याबरोबर आहोत' असे सांगितले. 'असे आहे तर मध्यंतरी तुम्ही जनता व लोकदलाबरोबर कसे होता ?' या प्रश्नाला उत्तर देताना हुसेनसाहेबांनी मोठे मनोरंजक तत्त्वज्ञान ऐकविले. त्यांचे म्हणणे असे की, आम्हा अल्पसंख्यांकांना जर आपले हित जपायचे असेल तर सत्ताधारी पक्षाबरोबरच राहण्याशिवाय गत्यंतर नाही. त्यामुळे कोणताही पक्ष सत्तेवर येवो आम्हाला त्यात असणे आहे. शिवाय जनता पक्षात राहून जनसंघाला सुधारण्याचा आम्ही प्रयत्न केला. तो पक्ष बदलेल असे वाटले होते; पण तो बदलत नाही, त्यामुळेही जनता पक्ष सोडणे भाग पडले !

बॅ. उस्मानी आणि अल्तफ हुसेन यांनी जे सांगितलं ते या आंदोलनाबाबतचा मुस्लिमांचा दृष्टिकोन स्पष्ट करणारं आहे. शक्यतो घुसखोरांची समस्या मानायचीच नाही व आंदोलनाला प्रतिगामी, संकुचित वगैरे ठरवून ते शक्य तितके बदनाम करायचे ही मुस्लिमांची रणनीती दिसते. सर्व बंगाल्यांची नव्हे, तर मुस्लिम बंगाल्यांचीच बाजू मांडण्याकडे उभयतांचा कल होता. थोडक्यात म्हणजे शक्यतो आंदोलन अधिकाधिक बदनाम करावे, त्याला प्रतिसाद मिळणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावेत, नच जमल्यास निदान बंगाली मुस्लिमांना या आंदोलनाने धोका निर्माण होणार नाही यासाठी प्रयत्नरत रहावे असे सर्वसाधारण 'मुस्लिम लॉबी'चे धोरण दिसते. पक्षभेद विसरून 'इस्लाम'च्या नावाखाली एकत्र येण्याचे धोरणही दिसून येते. त्यामुळेच गेल्या लोकसभा निवडणुकीत सर्व मुस्लिम नेत्यांनी सिल्चर मतदारसंघातील अर्स काँग्रेसच्या उमेदवार श्रीमती रशिदा हक् चौधरींसाठी काम केले. अर्थात याचो प्रति-

क्रियाही लगेच उमटली. सर्व प्रमुख राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी श्री. राणा देव हे इंदिरा काँग्रेसचे उमेदवार आहेत ही बाब विसरून ते हिंदू आहेत यासाठी त्यांचे काम केले. रा. स्व. संघाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनीही श्री. राणा देव यांना पाठिंबा दिला असे अनेकांकडून सांगितले जाते.

बहुसंख्य बंगाल्यांच्या या काचार जिल्ह्यातील एक राजकीय पुढारी श्री. परितोषपाल चौधरी यांनी अलीकडेच एक 'युनियन टेरिटरी डिमांड कमिटी' स्थापन केली असून काचार हा स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर करावा अशी त्यांची मागणी आहे. आपल्या मागणीचं समर्थन करताना श्री. चौधरी म्हणाले की, आसामात राहून आमची स्वतंत्र बंगाली संस्कृती टिकणार नाही असं आम्हाला वाटतं. सतत असमिया अधिकारी आमच्यावर वर्चस्व गाजवितात, आम्हाला हीन वागणूक देतात. शिवाय 'आसामच्या अन्य जिल्ह्यांपेक्षा काचार अधिक समृद्ध आहे. आमच्या समृद्धीच्या बळावर आसाम आपला विकास करून घेत आहे.' असंही चौधरी म्हणाले. कुठलं तरी निमित्त शोधून, त्याला अन्याय, कुचंबणा इ. शब्दांचं तिखटमीठ लावून विघटनवादाला खतपाणी घालण्याचे प्रकार कशा पद्धतीने सुरू आहेत, त्याचं एक उदाहरण म्हणजे श्री. चौधरी यांच्या हालचाली. अर्थात सुज्ञ बंगाल्यांचा या मागणीला अजिबात पाठिंबा नाही. स्वतंत्र केन्द्रशासित प्रदेश झाला म्हणजे खर्च वाढेल पण विकास होईलच असं नाही याची आपल्याला जाणीव असल्याचं अनेक सुशिक्षित बंगाली नागरिकांनी मला सांगितलं.

### बंगाली पत्रे-पत्रकार

स्वतंत्र व्यापाराची मागणी हा ज्या असमिया-बंगाली वैमनस्याचा भाग आहे, ते वैमनस्य किंवा ती तेढ या आंदोलनामुळे वाढीस लागल्याची जाणीव काचारमध्ये आल्यावर प्रकर्षाने होते. हे वैमनस्य वाढण्यास बंगाली पत्रकार आणि कलकत्त्याची तमाम बंगाली वृत्तपत्रे बव्हंशी कारणीभूत आहेत. आसामात बंगाल्यांची सर्रास कत्तल सुरू आहे. बंगाली मुलांना असमिया शाळेत कोंडून ठेवले जात आहे, बंगाली लोकांची घरे दिवसाढवळ्या लुटली जात आहेत इत्यादी निराधार आणि भडक प्रचार करण्यांत स्टेट्समन, अमृतबझार-पत्रिका इ. सर्व वृत्तपत्रे आजही अग्रेसर आहेत. हा प्रचार किती खोटा आहे याची कल्पना खुद्द आसामात गेल्याशिवाय येणार नाही. असमियांच्या मनात बंगाल्यांविषयी द्वेष आहे हे कोणीही नाकारणार नाही; पण हा द्वेष सहसा उग्र आणि हिंसक वळण घेत असल्याचे आढळत नाही. आधीच आपलं आंदोलन बदनाम करण्यासाठी अनेक शक्ती टपून बसल्या असताना बंगाल्यांना अधिक प्रचार करण्यासाठी कोणतेही निमित्त मिळू नये यासाठी सामान्यातला सामान्य असमिया विद्यार्थी खूप जागरूक आहे.

बंगाली पत्रकारांच्या खोडसाळपणाची दोन ठळक उदाहरणे देता येतील. आज आंतरराष्ट्रीय नियतकालिकांच्या पंक्तीत बसणारे प्रतिष्ठित भारतीय पाक्षिक म्हणजे 'इंडिया टुडे!' या पाक्षिकाच्या १६ फेब्रुवारी १९८० च्या अंकात 'आसाम अँड द नॉर्थ ईस्ट द डेंजर ऑफ सेसेशन' या नावाची 'कव्हर स्टोरी' प्रकाशित झाली आहे. या साहित्यिकाचा कलकत्त्यातील प्रतिनिधी सुमीर मित्रा याने हा दीर्घ लेख लिहिला असून त्यासाठी त्याने गौहातीसह ईशान्य भारताचा दौरा केल्याचा उल्लेख अंकाच्या संपादकीयात आहे. असमिया-बंगाली परंपरागत वैमनस्याची पार्श्वभूमी आसामातील सध्याच्या आंदोलनामागे आहे ही गोष्ट स्पष्ट असताना एका बंगाली पत्रकाराला आंदोलनाचा अहवाल घेण्यासाठी पाठविणे हीच खरं म्हणजे चूक आहे. एक स्वाभाविकपणे पूर्वग्रहदूषित पत्रकार आंदोलनाचे निष्पक्ष चित्र रेखाटणे कठीण आहे. मित्रा यांचा या अंकातील अहवाल वाचल्यावर ही बाब अधिक स्पष्ट होते. 'इंडिया टुडे'च्या या अंकात पृष्ठ ३९ वर दुलियाजानच्या हिंसक घटनेचा तपशील देताना पत्रकार सुमीर मित्रा म्हणतात, 'दुलियाजान पंपिंग स्टेशनवरील बंगालीभाषी भूगर्भशास्त्रज्ञ अधिकारी रवि मित्रा याला घराबाहेर काढून जमावाने मरेस्तोवर झोडपले.' मित्रा यांना जमावाने मरेस्तोवर झोडपले ही गोष्ट खरी असली तरी ते बंगाली आहेत व त्या द्वेषापोटी त्यांना मुद्दाम घराबाहेर काढून मारण्यात आले हे म्हणणे खरे नाही. मूळ दुर्दैवी घटनेस तिखटमीठ लावून ती अधिक भडक करण्याचा पत्रकार मित्रा यांचा प्रयत्न यांतून स्पष्ट होतो. आणखी एक उदाहरण याच अंकात पृष्ठ ४० वर आहे. पत्रकार मित्रा म्हणतात, 'दिब्रुगड शहरात मोटारींवरच्या क्रमांकांच्या प्लेटी रोमनऐवजी असमिया भाषेत नसतील तर मोटारींच्या काचांवर दगडफेक केली जाते!' असमिया भाषेतील क्रमांकाच्या प्लेटींबद्दल असा काही प्रकार आंदोलनाचे मुख्य केंद्र असलेल्या गौहातीत देखील आढळत नाही. थोडक्यात म्हणजे हाही भडक प्रचाराचाच एक नमुना आहे. मित्रा यांचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन या अहवालाच्या शीर्षकातूनही दिसून येतो. या संपूर्ण अहवालात हे आंदोलन चालविणारी आसाम विद्यार्थी संघटना विघटनवादी असल्याचा कोठेही उल्लेख नाही. संपूर्ण आंदोलन विघटनवादाकडे झुकत असल्याबद्दलही विवरण आढळत नाही. असं असूनही लेखाचं शीर्षक मात्र, 'द डेंजर ऑफ सेसेशन' असं भडकपणे देण्यात आलं आहे. या भडक शीर्षकामुळे 'इंडिया टुडे'चे अंक कदाचित जास्ती खपले असतील; पण असमियांचं आंदोलन मात्र हकनाक बदनाम झालं.

आसामातील चळवळ आसामबाहेर बदनाम होण्यात काही बंगाली पत्रकारांच्या खोडसाळपणाबरोबरच प. बंगालमधील मुख्यमंत्री ज्योती बसू यांच्या मार्क्सवादी सरकारचाही मोठा वाटा आहे. 'आसामात बंगाल्यांची राजरोस कत्तल होत आहे' हा आणि अशा प्रकारचे अनेक बेलगाम आरोप करणारी पत्रके सरकारीरीत्या प्रसिद्ध करणे हा ज्योती बसूंचा एक दैनंदिन कार्यक्रम होता आणि आहेही. मुख्यमंत्र्याला साथ द्यायला त्याचे सहकारी मंत्री तत्पर होतेच. सर्वसाधारण प्रत्येक पत्रकारपरिषदेत आसाम-आंदोलनाचा विषय असे व त्यावर टीका करण्याची, नवनवे आरोप करण्याची नित्य नवी संधी मंत्रिमहोदयांना मिळत असे, अजूनही मिळतेच. आसाम सरकारचे मुख्य सचिव श्री. परमसिंहन यांनी माझ्याशी बोलताना स्पष्टच सांगितलं की, मुख्यमंत्रिपदावरील जबाबदार व्यक्तीने, म्हणजेच ज्योती बसू यांनी तरी आसाममधील परिस्थितीबद्दल खरीखुरी माहिती मिळवून मगच निवेदने प्रसिद्ध करायला हवीत. मुख्यमंत्री बसूंची निवेदने प्रक्षोभक असतात व त्यामुळे

असमिया-बंगाली तेढ वाढीला लागते', असे सांगून परमसिहन म्हणाले की, या निवेदनामधील वृत्ताचा इन्कार करणे वा त्याबद्दल खुलासा करणेही आसाम राज्यसरकारला रोजची डोकेदुखी झाली आहे. आसामची राजधानी असलेल्या दिसपूर या गोहातीच्या उपनगरातील सचिवालयाच्या इमारतीत परमसिहन यांना मी भेटलो. तेव्हाही 'आसामात ४०० बंगाल्यांची कत्तल झाली' अशा आशयाच्या मुख्य मंत्री ज्योती बसूंच्या निवेदनाचा इन्कार करणाऱ्या पत्रकावर परमसिहन अखेरचा हात फिरवीत होते.

चाळिशी ओलांडलेले परमसिहन गेली अनेक वर्षे आसाम सरकारच्या सेवेत असून गोलप बोरबोरा यांच्या राजवटीत, पूर्वीच्या अविभक्त काँग्रेसच्या गौहातीत भरलेल्या 'जवाहरनगर' अधिवेशनात सरकारी यंत्रणेचा गैरवापर कसा झाला, याविषयी चौकशी अधिकारी म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. आता इंदिरा जमान्यात या अपराधाची किंमत त्यांना मोजावी लागणार असे गौहातीत अनेकांकडून सांगण्यात आले.

परमसिहन यांनी ज्योती बसूंच्या पत्रकबाजीबद्दल दिलेली माहिती कलकत्त्यातील पत्रकारांचा खोडसाळपणा किंवा काचारमधील वातावरण या तिन्ही बाबींमधून बंगाल्यांचा या आंदोलनाबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. सबंध असमिया-बंगाली संघर्षामागे एक मूलभूत बाब अशी आहे की, भारतीय बंगाल्यांना, म्हणजे प. बंगालच्या रहिवाशांना आपल्याच देशातील असमियांबद्दल नव्हे तर 'परदेशातील' (म्हणजेच बांगला देशातील) बंगालीभाषी लोकांबद्दल अधिक आपुलकी वाटते, ही गोष्ट असमियांनी ओळखली आहे व त्यामुळे त्यांच्याकडूनही तणाव वाढेल अशी कृत्ये घडतात. बंगाली लोक त्याचाही पुरेपूर फायदा उठवतात. तात्पर्य राष्ट्रीय भावबंधांपेक्षा भाषिक भावबंध अधिक चिवट ठरले आहेत. त्यामुळेच भारतीय बंगाल्यांना परके बंगाली 'घरातले' वाटतात तर घरातले असमिया 'परकीय' ही परिस्थिती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत असमियाबंगाली संघर्ष धुमसत रहाणे अपरिहार्य आहे.

## मार्क्सवादी म्हणजे बंगाली !

आसामातील आंदोलनाबाबतच्या बंगाल्यांच्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आसामातील काम व या पक्षाचा प्रभाव यांचा विचार करता येईल. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन-चारपेक्षा जास्त मार्क्सवादी आमदार विधानसभेत कधीच नव्हते. १९७८ मध्ये मात्र या पक्षाचे ११ आमदार निवडून आले. या पक्षाने जनता पक्षाशी निवडणूकसमझोता केल्याने हे यश मिळाले असे सांगण्यात येते. काहींच्या मते बंगाली घुसखोरांची संख्या वाढल्याने मार्क्सवाद्यांना हे यश मिळाले. मार्क्सवाद्यांना मिळालेले यश घुसखोरांमुळे मिळाले हे म्हणणे कितपत न्याय्य आहे याबाबत शंका असली तरी आसामात बंगाली म्हणजेच मार्क्सवादी हे समीकरण अगदी पक्के झाले आहे. अर्थात पक्षाच्या आसामशाखेचे सरचिटणीस श्री. अचिंत्य भट्टाचारजी यांना मात्र हे समीकरण मान्य नाही. 'हळूहळू असमियांचं प्राबल्य असलेल्या भागातदेखील आम्हाला वाढता पाठिंबा मिळत आहे,' असा त्यांचा दावा आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्टांनी आसाम गणसंग्राम परिषदेच्या लोकसभा निवडणुकीवरील बहिष्काराला कडाडून विरोध केला होता. त्यामागची भूमिका स्पष्ट करताना श्री. भट्टाचारजी म्हणाले, लोकशाहीत निवडणुकीवर बहिष्कार टाकणे हा आत्मघातकी प्रकार आहे. शिवाय समस्येविषयीचा आपला असंतोष व्यक्त करण्यासही आसामातील जनतेला निवडणुकीद्वारे एक संधी मिळाली असती. बहिष्कारामुळे ही संधी नाकारण्यात आली. त्याचा फायदा उठवून काही मंडळींनी विघटनवादी चळवळ सुरू केली. 'काही अमेरिकन गुप्तहेर या विघटनवादास प्रोत्साहन देत आहेत.' असाही आरोप श्री. भट्टाचार्यजींनी केला. घुसखोरांच्या या समस्येचे 'स्वातंत्र्योत्तर फाळणीचा एक दुर्दैवी परिणाम' या शब्दात वर्णन करून ते म्हणाले की, सध्याच्या आंदोलनाला आमच्या पक्षाचा अधिकृत पाठिंबा नसला तरी सप्टेंबर १९७८ मध्येच आम्ही या वाढत्या घुसखोरीबाबत चिंता व्यक्त करणारा एक ठराव संमत करून आमची जागरूकता दाखविली होती. या आंदोलनात भाषिक अल्पसंख्यांचा छळ केला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. या आंदोलनाची उद्दिष्टे अद्याप अस्पष्ट असल्याचे सांगून ते म्हणाले की, काही विशिष्ट संघटना सातत्याने विघटनवादी प्रचार करीत असल्या तरी काही मोजके तरुण वगळता सर्वसाधारण जनता ह्या प्रचाराची बळी ठरणार नाही. ख्रिश्चन मिशनरी सबंध पूर्वांचलात, कार्यरत असून स्वतंत्र 'ख्रिश्चन स्टेट' स्थापण्याची त्यांची कल्पना आहे व ती मंडळी या आंदोलनाचा गैरफायदा घेतील, अशी भीतीही श्री. भट्टाचारजी यांनी व्यक्त केली.

श्री. भट्टाचारजी यांच्या मुलाखतीवरून मार्क्सवाद्यांचा या आंदोलनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सौम्य वाटत असला तरी वस्तुस्थिती नेमकी तशीच नाही. जिथे जिथे बंगाली–असमिया संघर्ष झाला तिथे तिथे मार्क्सवादी बंगाल्यांचीच पाठराखण करीत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. कोणताही मार्क्सवादी अशा संघर्षात असमियांची बाजू घेईल यावर आसामात आज कोणीही विश्वास ठेवत नाही. शिवाय मार्क्सवाद्यांचे कामही प्रामुख्याने बंगाली बहुसंख्यांकांच्या प्रदेशात म्हणजेच काचार जिल्हा आणि उत्तरेत गोलपारा भागातच दिसून येते. प्रामुख्याने कामगारसंघटनेद्वारे पक्षाचे कार्य वाढत आहे व पक्षाजवळ कार्यकर्त्यांची फौजही आहे. असे असले तरी मार्क्सवादी म्हणजे बंगाली हे समीकरण जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत मार्क्सवाद्यांना खऱ्या अर्थाने कामाची बैठक बसविणे कठीण आहे. शिवाय बंगालमधील त्यांच्याच सरकारच्या पत्रकबाजीमुळेही मार्क्सवाद्यांपुढे समस्या निर्माण होत आहेत. कलकत्त्याचे सरकार आणि कलकत्त्याचे पत्रकार हातात हात घालून आंदोलनाविरुद्ध वातावरण तापवीत आहेत आणि कलकत्त्याशी घनिष्ठ नाते असलेल्या मार्क्सवाद्यांना आसामात अडचणीत आणीत आहेत.

असाच काहीसा कोंडीत सापडलेला आणखी एक पक्ष म्हणजे इंदिरा काँग्रेस. '१९७८ च्या विधानसभा निवडणुकीत या पक्षाला फक्त ८ जागा मिळाल्या होत्या; पण त्यानंतरच्या घटनाक्रमात या पक्षाचे मंदीचे दिवस संपले. इंदिरा काँग्रेसचा भाव वधारताच पक्षांतरे वेगात सुरू झाली आणि आजमितीस या पक्षाच्या विधानसभा

सदस्यांची संख्या ८ वरून ३६ वर येऊन ठेपली आहे. राज्यविधिमंडळात आज हा पक्ष सर्वांत मोठा आहे.

आंदोलनाच्या प्रारंभी या पक्षाची भूमिका काहीशी संदिग्ध होती. राज्यस्तरावरील काही नेत्यांनी आंदोलनाला उघड पाठिंबा दिला होता. पुढे हझारिका सरकार आल्यावर सत्ताधारी आघाडीत हा पक्ष सामील होता, त्यामुळे हे पाठिंबा देणे बंद झाले. मध्यंतरी पक्षाध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधींनी हे आंदोलन 'मुस्लिम विरोधी' असल्याचे ठरवून आंदोलनाच्या विरोधाची धार अधिक तीव्र केली. लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर या पक्षाने पुन्हा सामोपचाराची भूमिका घेतल्याचे दिसते. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच इंदिरा गांधींनी यशपाल कपूर व शंकर दयाळ शर्मा यांना आसामात पाठविले होते. इतर अनेक गोष्टींबरोबर 'सरकार बनविण्याबाबतच्या परिस्थितीची चाचपणी करणे' हाही उभयतांच्या आसाम-भेटीचा उद्देश होता; परंतु सद्य:स्थितीत राज्यात इंदिरा काँग्रेसचे सरकार येणे कठीण आहे. राष्ट्रपति राजवटीखालील या राज्याच्या विसर्जित न झालेल्या १२९ सदस्यांच्या विधानसभेत आज तीन जागा रिकाम्या आहेत. ३६ सदस्यांसह इंदिरा काँग्रेस हा विधानसभेतील सर्वांत मोठा पक्ष आहे तर २८ सदस्यांसह जनतापक्षाचा दुसरा क्रमांक आहे, अन्य पक्षांचे संख्याबळ असे – अर्स काँग्रेस १६, मार्क्सवादी कम्युनिस्ट ११, उजवे कम्युनिस्ट ७, क्रांतिकारी समाजवादी पक्ष ४, प्लेन्स ट्रायबल्स कौन्सिल ४, समाजवादी एकता केंद्र २, लोकदल ४ आणि अपक्ष ११. शक्यतो आपले सरकार स्थापन करून आंदोलन दडपून टाकावे असा इंदिरा काँग्रेसचा विचार होता; पण आवळचा–भोपळचांची मोट बांधून बहुमत प्रस्थापित करणे कपूर–शर्मा या जोडगोळीस जमले नाही. शिवाय बहुमत जमलेच तरी मुख्यमंत्री कोण, हा वादग्रस्त प्रश्न आहेच. राज्यविधिमंडळ पक्षाच्या नेत्या श्रीमती अनुरा तैमूर यांना नेतृत्वाच्या स्पर्धेत सुमारे अर्धा डझन स्पर्धक आहेत. आता बदललेल्या परिस्थितीत जोपर्यंत आंदोलन शांत होत नाही तोपर्यंत कोणतेही, राज्यसरकार लोकप्रिय होणार नाही याची खात्री पटल्यामुळे की काय, सरकार बनविण्याच्या कल्पनेस श्रीमती इंदिरा गांधींचाच तीव्र विरोध असल्याचे समजते.

आंदोलनाबाबत इंदिरा काँग्रेसची भूमिका जाणून घेण्यासाठी प्रदेश इंदिरा काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष ललितकुमार दोले यांची मी भेट घेतली. 'आसामातील सध्याचे आंदोलन एका न्याय्य व समर्थनीय मागणीसाठी आहे व या मागणीस आमच्या पक्षाचा पाठिंबा आहे.' असं श्री. दोले यांनी सांगितले. आंदोलन चालविणाऱ्या संघटनांनी परकीय नागरिक शोधून काढताना १९७१ हे आधार–वर्ष मानण्यास मान्यता देऊन केंद्र सरकारशी सहकार्य करावे ही आपली अपेक्षाही श्री. दोले यांनी बोलून दाखविली. 'काँग्रेसच्या राजवटीत आसामकडे सतत दुर्लक्ष करण्यात आले' या म्हणण्यात तथ्य नसल्याचे सांगून ते म्हणाले की राज्यकर्त्यांनी मुद्दाम वा हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले असे म्हणता येणार नाही. मात्र आसामच्या समस्यांचा याआधीच गांभीर्याने विचार व्हायला हवा होता हे मात्र खरे आहे.' 'श्रीमती गांधी आसामात यायला उत्सुक आहेत; पण परकीय मुत्सद्दी व देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले हजारो स्त्री-पुरुष रोज इंदिराजींना भेटायला दिल्लीला येतात. तेव्हा त्यामुळे त्या अडकून पडल्या आहेत.' असे हास्यास्पद विधानही दोले यांनी केले. 'आसामातील-सध्याच्या कठीण परिस्थितीचं आव्हान पेलण्यासाठी इंदिराजींनी मुद्दाम मला अध्यक्षपदी नेमलं,' असं सांगून ते म्हणाले, 'कृपया ही बाब आपण विद्यार्थीनेत्यांच्या लक्षात आणून द्या व त्यांना माझ्याकडे चर्चेला पाठवा!'

बोलण्याचा पाचपेच नसलेली व सहजगत्या आपल्या हातचे बाहुले बनणारी व्यक्ती पक्षाच्या प्रदेशशाखांच्या अध्यक्षपदी नेमण्याचा इंदिराजींचा खाक्या पाहता दोले यांची निवड योग्य आहे. पन्नाशीला टेकलेले दोले गेली अनेक वर्षे लोकसभेत खासदार म्हणून होते व अविभक्त काँग्रेसच्या काळातही प्रदेशशाखेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. दोले यांच्या चेहरेपट्टीवरूनच ते आदिवासी आहेत हे लक्षात येते. बोलताना डोळे बारीक करून नखरेलपणे मुद्दा मांडण्याची ललितकुमारजींची पद्धत लक्षात राहण्यासारखी आहे.

## जनता पक्षाची भूमिका

मार्क्सवादी कम्युनिस्ट वा इंदिरा काँग्रेसपेक्षा जनता पक्षाची या आंदोलनाबाबतची भूमिका अधिक भावात्मक वाटली. पक्षाच्या राज्यशाखेचे सरचिटणीस कवींद्र चतर्जी यांनी, जोपर्यंत परकीयांची नावे मतदारयाद्यांतून वगळली जात नाहीत तोपर्यंत निवडणुका घेण्यास आपला पक्ष विरोध करील असे सांगितले. सप्टेंबर ७९ मध्ये पक्षाच्या राज्यशाखेने एका ठरावान्वये आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा दिला, ही माहिती सांगून ते म्हणाले की, विद्यार्थ्यांचे सध्याचे आंदोलन अहिंसक व शांततापूर्ण असल्याने यापुढेही आमचा पाठिंबा सुरूच राहील. लोकांच्या भावनेचा आदर करून गेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या उमेदवारांना अर्ज न भरण्याचा सल्ला देणारा आमचा एकमेव पक्ष होता असेही कवींद्रदा म्हणाले.

प्रदेश जनताध्यक्ष गौरीशंकर भट्टाचार्य यांनी सांगितले की, सत्याग्रहात सामील होण्याचा आमच्या पक्षकार्यकर्त्यांना वेगळा आदेश देण्याची गरज नाही. अखेर ही लोकांची चळवळ आहे, त्यापासून आमचे कार्यकर्ते अलिप्त कसे राहतील? 'वी सपोर्ट द स्पिरिट ऑफ धिस मूव्हमेंट' असं सांगून ते म्हणाले, या चळवळीमुळे प्रथमच असमियांचा वयंकार जागृत झाला आहे. पूर्वांचलीय लोकपरिषदेचे निवारण बोरा या आंदोलनाला जाणूनबुजून विघटनवादी बनवीत आहेत याबद्दलही त्यांनी खेद व्यक्त केला. लोकपरिषदेच्या या कारवायांमुळेच ख्रिश्चन मिशनऱ्यांचे चांगलेच फावते असेही त्यांनी सांगितले.

आसामातील प्रमुख राजकीय पक्षांचा आंदोलनाबाबतचा दृष्टिकोन व आंदोलनातील सहभाग व एकूण आंदोलनाचे स्वरूप याचा विचार करता सर्वच राजकीय पक्ष या आंदोलनाच्या बाबतीत पूर्णत: निष्प्रभ असल्याचे प्रकर्षाने जाणवते. विद्यार्थी नेत्यांना हाताशी धरून राजकीय उद्दिष्टे साधण्याचे प्रयत्न सर्वच राजकीय पक्षांनी केले असतील; पण त्यांना भीक न घालता आपली राजकीय अलिप्तता कायम ठेवण्यात विद्यार्थीनेत्यांनी स्पृहणीय यश मिळविले आहे. एरवी आंदोलनाच्या धामधुमीत राजकीय डावपेच खेळण्यात मग्न असलेले राजकारणी या आंदोलन-काळात अक्षरश: बेकार असल्या-

सारखे पडून आहेत. खासदार अस्तित्वातच नाहीत, विधानसभा तहकूब असल्याने आमदारांना काम नाही आणि आंदोलन चालू असताना सरकार बनविणे हे सुळावरची पोळी खाण्यासारखे असल्याने सत्तास्पर्धेत कोणी फारसे उत्सुक नाही, असा सगळा थंडा मामला आहे. त्यामुळे सामान्यतः सर्व प्रमुख पक्षांचे कार्यकर्ते सत्याग्रहात उतरले तरी ते पक्षाचे झेंडे गुंडाळूनच. थोडक्यात म्हणजे आपल्या भीषण समस्येच्या सोडवणुकीसाठी निश्चयानं गोळा झालेल्या विराट जनसागरात राजकीय नेत्यांना 'राजकारण्यांच्या' थाटात शिरायला जरादेखील वाव उरलेला नाही आणि सर्व प्रश्न राजकीय दृष्टीनेच सोडविणाऱ्या पंतप्रधान इंदिरा गांधींची यामुळेच खरी अडचण झाली आहे.

जाता जाता आसामच्या आर्थिक नाकेबंदीचे जे प्रयत्न इंदिरा काँग्रेस करीत आहे त्याचाही आढावा घ्यायला हवा. ही नाकेबंदीची टूम आसामातील बंगाल्यांवर होणाऱ्या तथाकथित अत्याचारांविरुद्ध असल्याचे इंदिरा काँग्रेसने सांगितले आहे. प. बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसू यांनी तर अत्याचारांना कंटाळून शेकडो बंगाली रोज बंगालमध्ये येतात असेही म्हटले आहे. श्री. बसू यांचा हा दावा खरा असण्याची शक्यता असली तरी त्यामुळे आसामच्या नाकेबंदीचे समर्थन करता येणार नाही. कारण आसामातून प. बंगालमध्ये येणारे हे बंगाली, मुळात कोण आहेत हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्या गोलपारा जिल्ह्यातून बंगाली लोक नजीकच्या प. बंगालमध्ये जातात तो जिल्हा बांगला देशाच्या सीमेस लागून आहे. त्यामुळे बांगला देशातून आलेले शेकडो घुसखोर, आसामातील आंदोलन यशस्वी ठरल्यास आपल्याला जावे लागेल या भीतीपोटी प. बंगालमध्ये आश्रय घेत असण्याची दाट शक्यता आहे. आपण मूळचे भारतीय आहोत असा दावा आसामपेक्षा प. बंगालमध्ये ते अधिक सहजपणे करू शकतात व त्यामुळे अधिक सुरक्षित ठिकाणी या घुसखोरांनी पळ काढणे स्वाभाविक आहे. अर्थात सर्वच बंगाली घुसखोर असतील असे मात्र नाही.

आसामातील बंगाली बंगालमध्ये येऊ लागल्याच्या समस्येमुळे मार्क्सवाद्यांचा पवित्रा एकदम बदलला आहे. आज इंदिरा काँग्रेसच्या नाकेबंदी आंदोलनास कडाडून विरोध करणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्टांनी सुमारे महिनाभरापूर्वीच सिलीगुरीत, आसामात साखरेची पोती नेणारे ट्रक दोन दोन दिवस अडवून ठेवले होते. पुढे मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीने हे आंदोलन इथेच संपले, हे खरे असले तरी त्याचा अर्थ आसामची आर्थिक नाकेबंदी होऊ नये असे मार्क्सवादी पक्षास प्रामाणिकपणे वाटते असा मात्र नाही. आज इंदिरा काँग्रेसने आघाडी मारून ही तलवार उपसली आहे, त्यामुळे मार्क्सवाद्यांना विरोधाची ढाल पुढे करणे भाग पडले आहे. त्या निमित्ताने आसामबद्दल आपली औदार्याची, सहानुभूतीची लटकी भावना व्यक्त करण्याची संधी मार्क्सवाद्यांना मिळाली आहे. अर्थात असमिया जनता याला फसणार नाही. मार्क्सवाद्यांबद्दल आसामात आधीपासूनच परकेपणाची भावना होती. आता इंदिरा काँग्रेसही नव्याने जागृत झालेल्या असमियांचे समर्थन गमावून बसण्याची शक्यता आहे.

## संघपरिवार

अगदी अलीकडच्या घडामोडींपर्यंत आसामातील आंदोलनाबद्दल राजकीय पक्षांनी घेतलेल्या भूमिकांचा परामर्श घेतल्यानंतर आता रा. स्व. संघ व संघपरिवारातील अन्य संघटनांचा या आंदोलनातील सहभागाचा आढावा घ्यायला हवा.

संघाचे सरकार्यवाह प्रा. राजेंद्रसिंह यांनी नागपूरच्या प्रतिनिधिसभेच्या बैठकीपूर्वी पत्रकारांना सांगितले होते की, आसामातील आंदोलनाचे श्रेय संघाला देणे हा स्टुडंटस युनियन व गणसंग्राम परिषदेचा अपमान ठरेल! संघाचे आसामातील कार्य, त्याचा विस्तार, संघाची मर्यादित शक्ती व संघपरिवारातील बहुसंख्य संघटनांची आसामातील अनुपस्थिती याचा विचार करता प्रा. राजेंद्रसिंह यांचे म्हणणे खरे असल्याचाच प्रत्यय येतो.

अन्य सर्व प्रांतांच्या तुलनेत आसामात आणि पर्यायाने सर्व पूर्वांचलात संघाचे काम सर्वाधिक उशीरा म्हणजे १९४७ मध्ये सुरू झाले. अर्थात असे असले तरी आज आसामच्या जवळजवळ सर्व जिल्ह्यांतून संघ पोचला आहे. संघाचे एकट्या आसामात सुमारे २५ प्रचारक आहेत. गौहाती, नलबारी, सिब्चर, जोरहट इ. सर्व प्रमुख शहरांतून तुलनेने संघाचे काम अधिक चांगले व अधिक व्यापक पायावर आधारित असे आहे. त्यातल्या त्यात नौगाव जिल्ह्यात संघाचे अस्तित्व अधिक जाणवण्याजोगे आहे. अलीकडेच निधन पावलेले आसाम साहित्य सभेचे एक ज्येष्ठ पदाधिकारी नौगावचे संघचालक होते. आपल्याकडे साहित्यिक आणि संघ जवळ आल्याची फारशी उदाहरणे दिसत नाहीत, त्या संदर्भात ही बाब उल्लेखनीय आहे. सुशिक्षित मध्यमवर्गीय व पांढरपेशांबरोबर इतर ठिकाणांप्रमाणेच, आसामातही मारवाडी व्यापाऱ्यांचा संघातील सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे.

संघाने प्रथमपासूनच या आंदोलनाला राष्ट्रवादी आंदोलन मानून त्याचे समर्थन केले आहे. हे आंदोलन 'बहिरागत विरोधी' बनणे देशाच्या एकात्मतेला धोकादायक आहे हे ओळखून ते 'विदेशी विरोधी' बनविण्यात संघाचा मोठा वाटा आहे. विदेशी विरोधी आंदोलन हा शब्दप्रयोग प्रथम संघाने सुरू केला व तो आज गणसंग्राम परिषदेसकट सर्वांनी उचलला आहे. जवळपास गेले एक तप संघाचे पूर्वांचलासाठीचे प्रांतप्रचारक म्हणून काम पाहणारे, मूळचे मुंबईचेच राहणारे श्री. श्रीकांत जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे

संघाचे अनेक स्वयंसेवक, प्रचारक खुद्द श्री. जोशी यांनी सुद्धा या आंदोलनांतर्गत गणसत्याग्रहात भाग घेतला आहे. या आंदोलनाविषयी संघनेत्यांनी काही धोरणात्मक निवेदनेही प्रसिद्ध केली आहेत. संघ आणि ऑल आसाम स्टुडंटस युनियनचे नेते परस्परांना चांगल्या प्रकारे व चांगल्या अर्थाने ओळखून आहेत; पण असे असले तरी आंदोलनाची सूत्रे संघाकडे आहेत या म्हणण्यात काहीही तथ्य नाही. अशी सूत्रे हाती घेण्याइतकी ताकद आज आसामातील संघाच्या कामात नाही. त्याचप्रमाणे या आंदोलनाची सूत्रे संघासारख्या कोणत्याही एका संघटनेकडे राहतील ही बाबच आंदोलनाचे सध्याचे स्वरूप पाहता असंभवनीय आहे.

आज आसामचे आंदोलन खरेखुरे जनआंदोलन झाले असल्याने संघाने या आंदोलनाला विरोध केला असता तरी संघस्वयंसेवक समाजातील एक घटक म्हणून सत्याग्रहात गेले असते. आज या आंदोलनाचा संघाच्या कामावरही परिणाम झाला आहे. गतवर्षी या भागात संघाच्या एकूण २०७ शाखा होत्या, आज ती संख्या १७६ वर आली आहे.

अलीकडेच सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांनी गौहाती व सिह्चर, इंफाळचा दौरा केला आहे. तत्पूर्वी सरकार्यवाह प्रा. राजेंद्रसिह देखील या भागात येऊन गेले. या उभयतांच्या भेटीपूर्वी, गेल्या नोव्हेंबरमध्ये संघाचे पूर्वांचलाचे क्षेत्रीय संघटक श्री. के. एस. सुदर्शन गौहातीत आले होते, त्या वेळी त्यांनी प्रसिद्ध केलेले पत्रक आंदोलनाबाबतची संघाची अधिकृत भूमिका स्पष्ट करणारे आहे.

१९५१ नंतर बांगलादेशातून भारतात आलेल्या तमाम हिंदूंना निर्वासित समजून त्यांचा भारत सरकारने स्वीकार करावा, तसेच त्यांच्या पुनर्वसनासाठी विविध राज्यांना काही निर्वासितांची जबाबदारी घेण्यास भाग पाडण्यात यावे, अशी मागणी या पत्रकात करण्यात आली आहे. मुस्लिमांच्या भारतातील घुसखोरीमागे स्पष्ट राजकीय उद्दिष्टे असल्यामुळे १९५१ नंतर भारतात आलेल्या मुस्लिमांना बांगला देशात परत पाठविले जावे असेही या पत्रकात पुढे म्हटले आहे. याशिवाय परकीयांची नावे मतदारयाद्यात वगळल्याखेरीज निवडणुका घेऊ नयेत, १९५१ हे आधारवर्ष मानून राष्ट्रीय नागरिकत्वाचे रजिस्टर बनविण्यात यावे व बांगला देशातील धार्मिक अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणाचा भारत सरकारने त्या सरकारकडे आग्रह धरावा असेही या पत्रकात नमूद केले आहे.

संघपरिवारातील अन्य संघटनांपैकी विश्व हिंदू परिषद व अ. भा. विद्यार्थी परिषदेचे काम या भागात सुरू झाले आहे. विश्व हिंदू परिषदेनेही हिंदूंचा स्वीकार करण्याची मागणी केली असून केंद्रीय गृहमंत्र्यांना एक निवेदनही दिले आहे. दंगलग्रस्तांना मदत पोहोचविण्यातही ही संस्था आघाडीवर आहे. श्री. सतीश वेलणकर यांच्यासारखा एक उत्साही आणि आव्हाने पेलू शकणारा प्रचारक लाभल्याने विद्यार्थी परिषदेचे काम या भागात चांगल्या प्रकारे सुरू होण्यास मदत मिळाली आहे. आज आसामातील विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन पोहोचणे हेच विद्यार्थी परिषदेसमोरील मुख्य काम आहे. त्यामुळे या आंदोलनात विद्यार्थी परिषदेचा सहभाग सांख्यिकदृष्ट्या नगण्यच म्हणावा लागेल; परंतु प्रश्नाचे गांभीर्य मात्र परिषदेने जाणले आहे. निवडणुका पुढे ढकलण्यात याव्या यासाठी परिषदेने राष्ट्रपतींना निवेदनही दिले होते. अन्य प्रांतांतही या प्रश्नाबाबत जागृती व्हावी यासाठी परिषद प्रयत्नशील आहे.

विद्यार्थी परिषदेचे श्री. सतीश वेलणकर व संघाचे श्री. श्रीकांत जोशी या उभयतांनी माझ्या आसाम–प्रवासात मला मोलाची मदत केली. त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख अगत्याचा आहे.

या आंदोलनाच्या संदर्भात असमिया–बंगाली संघर्ष आणि राजकीय पक्षाच्या भूमिकांचा सविस्तर आढावा या लेखांकात घेतला. आता अगदी अलीकडच्या घडामोडी, या आंदोलनाचे आजचे स्वरूप व त्याचे परिणाम इ. मुद्द्यांसह समारोपाचा लेख पुढील अंकी.

[ क्रमशः ]


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपयें. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

पुस्तके

# मनात झिरपणाऱ्या सासणेंच्या कथा

## जॉन आणि अंजिरी पक्षी

जॉन आणि अंजिरी पक्षी हा श्री. भारत सासणे यांचा पहिलावहिला कथासंग्रह. सासणेंच्या या सर्व कथा यापूर्वी कुठे ना कुठे वाचल्या असल्या तरीही पुस्तकरूपाने या वाचताना त्यांचा कथाप्रवास लक्षात येतो. सासणे यांच्या कथांनी कथाक्षेत्रात खूप वेगळ्या वाटा निर्माण केल्या आहेत असे म्हणणे बरोबर होणार नाही; पण आधुनिक कथासाहित्यात त्यांच्या कथांचे स्थान आशय, अभिव्यक्ती, फॉर्म या संदर्भात वेगळेपणा दाखविणारे आहे.

जॉन आणि अंजिरी पक्षी या संग्रहात एकूण ११ कथा समाविष्ट केल्या आहेत. लेखकाने या कथांबाबत सुरुवातीलाच म्हटले आहे की, 'एक एक कथा माझ्यातून झिरपल्या. स्फटिकाने प्रकाशाच्या अंतरात दडलेल्या रंगांचा अनुभव घ्यावा व ते प्रकट करावेत तशा. ह्या प्रकटीकरणात माझेही काही अंगभूत रंग मिसळले असतील, ह्या माझ्या मर्यादा. रंग अनेक आहेत आणि प्रकाश तर अथांग आहे, ह्याची मला जाणीव आहे.'

कथा वाचल्यानंतर मात्र या निवेदनातील एक गोष्ट खटकते. अभिव्यक्तीमध्ये आपले स्वतःचे अंगभूत रंग मिसळले असतील तर त्या लेखकाच्या मर्यादा नसून ते लेखकाचे यश आहे. अनुभवनिष्ठ साहित्यामध्ये लेखकाचे स्वतःचे रंग झिरपल्याशिवाय त्या साहित्याचे कलामूल्य ठरविता येणे शक्य नसते. लेखकाला या मर्यादा का वाटतात ते कळत नाही.

जीवनानुभवाचा प्रत्यय अभिव्यक्त करताना या अथांगतेची जाणीव असणे जसे स्वाभाविक आहे तसेच त्या अनुभवाचे अनुभवांतर करण्यासाठी या अथांगतेतला एकच तुकडा ज्या उत्कटतेने मांडला जाणेही स्वाभाविक आहे, ती उत्कटता अथांगाला नाकारीत नाही. अनुभवाचे पदर उलगडवून दाखवताना त्याच्या मागे आणि पुढेही अथांग पसरले आहे याची जाणीव जशी लेखकाला असते तशीच विचक्षण वाचकालाही असते; पण म्हणून त्या अनुभवाचे महत्त्व कमी होत नाही. अनुभवाचा सच्चेपणा ज्या फॉर्ममधून ज्या पद्धतीने अभिव्यक्त होत असतो त्यावरून त्या अनुभवाची कलात्मक पातळी ठरत असते.

ही उत्कटता, हा सच्चेपणा सासणेंच्या काही कथांमधून प्रकर्षाने जाणवतो. 'कावळे उडाले स्वामी', 'स्वच्छ झिरपता प्रकाश', 'महायात्रा' यासारख्या काही कथा विषयाची वेगळी मांडणी, अनुभव यामुळे वेगळ्या आणि लक्षणीय वाटतात. 'कावळे उडाले स्वामी 'सारख्या कथेत एका मध्यमवर्गीय तरुणाची 'गोष्ट' सांगितलीये. आईचे भाविकपण मुलाच्या प्रेमाला पूरक बनते आणि याची जाणीव असणारा विनायक सारखा अस्वस्थ असतो. वडिलांचाच कित्ता लेखणारा हा मुलगा देवळाजवळच्या सरस्वतीच्या प्रेमात पडतो; पण जीवनात कुठलीच गोष्ट आपल्या मनाप्रमाणे हिसकावून घेण्याची इच्छा नसणाऱ्या त्याच्या हाती काहीच लागत नाही. हातात पडते ती एक वळवळणारी अस्वस्थता. त्याच्याभोवती हळदीच्या उन्हानं विस्कटलेल्या झाडांच्या सावल्या गडद होतात. या विनायकाच्या मनातली खळबळ लेखक अतिशय बारकाव्याने सांगत असतो. त्याचप्रमाणे आजूबाजूचे तपशीलवार सांगून लेखक या अनुभवाची छाया गडद करीत असतो.

जॉन आणि अंजिरी पक्षीमधल्या जॉनचे व्यक्तिचित्रही सासणेंनी इतक्या तरल संवेदनांनी मांडलंय, जॉनच्या सवयी, लकबी यांचं वर्णन इतक्या बारकाईनं त्यांनी केलंय की जॉन साक्षात उभा राहतो. एकूण सर्वच कथांमधील 'तपशीलवार मांडणी' हा एक वेगळेपणाच म्हणावा लागेल.

सासणेंच्या कथांच्या मांडणीमध्ये एक प्रकारची विशेष बांधणी दिसून येते. कथाविषयाचे सूत्र फॉर्ममधून मांडताना लेखक आपली एक स्वतःची शैली तयार करीत असतो. अग्निसारखी कथा फॉर्मच्या दृष्टीने वेगळेपणा दाखवणारी आहे. 'सये तुझे डोळे' मधील उत्कट भावना खरोखरच सुन्न करून टाकणारी आहे. एक सांसारिक अनुभव या कथेतून सजीव होऊन येतो. आपल्या नवऱ्याच्या प्रेमळ शब्दांसाठीच अत्युत्सुक असणारी पत्नी जेव्हा तो सर्वस्व अर्पण करतो तेव्हा आपल्या दारिद्र्याला, दुःखाला सगळ्यालाच ती सामावून घेते. अशा स्त्रीचे एक मनोज्ञदर्शन या कथेतून घडते.

सासणेंच्या कथांमध्ये प्रतिमांचा वापरही सढळपणे केलेला आढळून येतो; पण या प्रतिमा खटकणाऱ्या नाहीत. 'एक नपुंसक रागाची लाट त्याच्या मनातून उधळत गेली', 'कंदिलाचा मंद प्रकाश घरातील सर्व वस्तूंस स्पर्श करीत घरभर फिरला.' यांसारख्या वाक्यांमधून संवेदना नेमकेपणे झिरपताना दिसतात; पण तरीही या कथांमध्ये कुठलाही उपरा बाज नाही. जे आहे ते त्या अनुभवाबरोबर सहजपणे आलेलं.

यामध्ये कुठलाच दांभिकपणा नाही, खोटेपणा नाही, म्हणूनच या कथांची वाचनीयता वाढलेली आहे; पण तरीही सर्वच कथांच्याबाबत असे म्हणता येणार नाही. महायात्रासारख्या कथेत इतर कथांचा काहीसा पगडा दिसून येतो, तर अग्निसारख्या कथेतून फॉर्मकडेच जास्त लक्ष दिल्यासारखे वाटते. अशी उदाहरणे मोजकीच आहेत व त्यामुळेच लक्षात न घेण्यासारखीच आहेत.

पण एकूणच आपले भावविश्व चित्रित करताना सासणेंनी आपल्या अनुभवांशी जं इमान राखले आहे ते या कथांमधून दर्शित होते आणि म्हणूनच या भावविश्वात वाचकही सामावला जातो. हे भावविश्व जरी लेखकाचे स्वतःचे असले तरीही त्यामध्ये एकप्रकारचा सामान्यपणा (Universal) असल्यामुळे की काय ते जास्त भावते.

आपल्या या पहिल्याच आविष्काराने

ारत सासणेंनी अपेक्षा उंचावल्या आहेत हे मात्र निश्चित !

—मुकुंद संगोराम

**जॉन आणि अंजिरी पक्षी**
भारत सासणे
चेतश्री प्रकाशन, अमळनेर,
पृष्ठे : १३३, मूल्य : १५ रुपये.

# शुभमंगल सावधान

विवाह ही माणसाच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाची घटना असते. विवाह करणे / न करणे, विवाहसंस्थेची आवश्यकता/ निरुपयुक्तता, प्रेमविवाह योग्य / अयोग्य इत्यादि विवाहसंबंधी मुद्द्यांवर स्फुट लेखापासून ते जाडजूड पुस्तकापर्यंत साहित्य लिहिले गेले आहे. एक गोष्ट मात्र खरी, सांस्कृतिक उत्क्रांतीतून जन्मलेल्या या विवाह-विधीसाठी अन्य सर्वमान्य पर्याय मिळेपर्यंत त्या पर्यायाचा शोध आणि विवाहसंस्था या दोन्ही गोष्टी अस्तित्वात राहणारच. विवाह म्हणजे नेमके काय हे सांगता येणे कठीण असले तरी स्त्री-पुरुषांचे शारीरिक व मानसिक मीलन, दोघांचे एकरूप होणे वगैरे वगैरे बऱ्याच गोष्टी त्यात अध्याहृत धरल्या जातात. पति-पत्नीचे नाते हे तसे एकमेवाद्वितीय नातेच आहे. जन्मतःच बांधील नसलेले दोघेजण उरलेले आयुष्य एकमेकांबरोबर काढण्यासाठी एकत्र येतात. दोघांची भिन्न व्यक्तिमत्त्वे, एकमेकांबद्दलच्या अपेक्षा, त्या अपेक्षांची पूर्ती न झाल्यास निर्माण होणारे प्रश्न या सगळ्यांचा त्यांच्या आयुष्यावरच नव्हे, तर त्यांच्या निकटवर्तुळातील व्यक्तींच्या आयुष्यावरही परिणाम होत असतो. या सगळ्या गुंतागुंतीमधून अनेक समस्या उभ्या राहू शकतात. बरेचदा तर काही तरी चुकते आहे, खटकते आहे एवढीच जाणीव माणसाला असते; पण हे चुकणारे वा खटकणारे नेमके काय ते मात्र त्याला उमगत नाही. कधी कधी अत्यंत भयंकर वाटणाऱ्या प्रकाराच्या मुळाशी एखादा क्षुल्लक प्रश्न असतो; तर कधी कधी वरवर लहानशा दिसणाऱ्या गोष्टींच्या बुरख्याआड एखादी कुरूप विकृती दडलेली असते.

अशा बऱ्याच प्रश्नांची जाणीव-करून देणारे 'शुभमंगल सावधान' हे पुस्तक नीलकंठ प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झाले आहे. पुस्तकाचे लेखक आहेत डॉ. र. वैं. शिरवैंकर. डॉ. शिरवैंकर हे स्वतः अत्यंत नाणावलेले मानसचिकित्सक (Psychiatrist) आहेत. त्यांनी स्वतःच्या व्यासंगातून आणि आपल्यासमोर आलेल्या निरनिराळ्या मनोरुग्णांच्या अभ्यासातून, अनुभवातून या पुस्तकातील विवाहविषयक निरनिराळ्या गोष्टींची चिकित्सा करणारे एकवीस लेख लिहिले आहेत.

विवाह का करतात, साथीदाराची निवड, येथपासून ते विवाहोत्तर जीवनात येणाऱ्या मानसिक व शारीरिक (मुख्यतः लैंगिक) संबंध व समस्यांबाबत डॉ. शिरवैंकरांनी या लेखांमध्ये चर्चा केली आहे. एक सर्वप्रथम स्पष्ट केले पाहिजे की, 'शुभमंगल सावधान' हे विवाहशास्त्र वा वैवाहिक समस्यांवरील अभ्यासक्रमातील क्रमिक पुस्तक नाही. साहजिकच त्यात शास्त्रीय माहिती येते ती अत्यंत सुटसुटीत भाषेत. क्लिष्ट शास्त्रीय परिभाषा या पुस्तकात अभावानेच आहे; पण हे सर्व सांगणे म्हणजे केवळ व्यवहारज्ञान वापरून दिलेले सल्ले नाहीत; तर त्याला काही शास्त्रीय पाया खचितच आहे याचीही जाणीव आपल्याला राहते. त्यामुळेच हे पुस्तक सामान्य माणसाला अत्यंत उपयुक्त वाटेल. पुस्तक लिहिताना लेखकाच्या नजरेपुढे हा सामान्य माणूस कायम आहे; त्यामुळे संपूर्ण पुस्तकात उदाहरणांसाठी ज्या समस्यांचा लेखकाने ऊहापोह केला आहे, त्या आपल्या आजूबाजूला सहज दिसून येण्यासारख्याच असतात. पुस्तकाचे नाव जरी 'शुभमंगल सावधान' असले तरी हे पुस्तक खरे म्हणजे जे विवाहाच्या उंबरठ्यावर उभे आहेत अशांनी अथवा नवविवाहितांनी अत्यंत आवर्जून वाचावे. विवाहितांनीही 'better late than never' म्हणून वाचावे. कदाचित तुमच्या लक्षात न आलेल्या अनेक समस्या केवळ त्यामुळे सुटू शकतील.

विवाहपूर्व वा विवाहोत्तर स्त्रीपुरुषसंबंधाबद्दल आत्यंतिक एकनिष्ठा हा भारतीय संस्कृतीचा दृष्टिकोन तर स्वैर संबंध हा टोकाचा आधुनिक दृष्टिकोन. यापैकी कोणत्याही एकाचा स्वीकार वा पुरस्कार न करता प्रत्येक वेळी डॉक्टरांनी निरनिराळ्या अंगांनी प्रत्येक समस्येचा वा गोष्टीचा विचार केला आहे. तो परिपूर्ण आहे, असे धाडसी विधान कोणीच करणार नाही; पण भावनिक, व्यावहारिक वा अन्य कोणत्याही पातळीवरून विचार करताना डॉक्टरांनी सुखी व्यक्तिजीवन आणि त्यातूनच जन्मणारा निकोप समाज सतत डोळ्यांसमोर ठेवल्याचे प्रामाणिकपणे जाणवते. सर्व लिखाणातून त्यांचा प्रयत्न मने जुळविण्यासाठी आहे. किशोरावस्थेत वा पौगंडावस्थेत वाटणाऱ्या निरनिराळ्या आकर्षणांपासून, त्या वेळी होणाऱ्या निरनिराळ्या संस्कारांपासून विवाह, मधुचंद्र, विवाहानंतरचे सुरुवातीचे काही दिवस, घटस्फोट इत्यादि विविध स्थित्यंतरांचा डॉक्टरांनी लिहिलेला आलेख अतिशय पटणारा आहे. संपूर्ण लिखाणातील प्रामाणिकपणामुळेच लेखनाच्या शैलीतील दोष वाचताना ध्यानातही येत नाहीत.

पुस्तकातील प्रत्येक प्रकरणात एक वा दोन चित्रे टाकली आहेत. ती लेखनाशी सुसंगत असली तरी त्यामुळे काही अधिक स्पष्टीकरण होते असे मात्र वाटत नाही त्यामुळेच ती अनावश्यक वाटतात. एक स्त्रीचा हात व एक पुरुषाचा हात यांनी तोललेला मंगलकलश असे मुखपृष्ठ आणि पुस्तकाचे 'शुभमंगल सावधान' हे नाव या दोन काहीशा पारंपारिक वाटणाऱ्या गोष्टी असल्या तरी पुस्तक मात्र आधुनिक विचारांचा साज ल्यालेले आहे.

सरतेशेवटी सामान्य माणसाच्या दृष्टीने असलेला अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न— पुस्तकाची किंमत. ती मात्र थोडीशी नव्हे तर बरीचशी जास्त वाटते. पंचवीस रुपये ही किंमत सुखी आयुष्याच्या बदल्यात फारशी नसली तरी एकशेपन्नास कागदांच्या बदल्यात अजूनही आपल्याला जास्त वाटतेच.

—सदानंद

**शुभमंगल सावधान**
डॉ. र. वैं. शिरवैंकर
नीलकंठ प्रकाशन, पुणे
पृष्ठे—१४५, किंमत—२५ रुपये

## फिनिक्स निवड

# I Married A Bestseller

(Autobiography) By Sheila Hailey
Wife of Arthur Hailey
(Bantom Books, Pages 276,
Price $ 2–25)

'एअरपोर्ट', 'हॉटेल', 'फायनल डायग्नॉसिस', 'व्हील्स', 'रनवे झीरो एट', 'इन हाय प्लेसेस', 'मनीचेंजर्स' व अगदी अलीकडचे 'ओव्हरलोड' ही प्रख्यात पुस्तके लिहिणारे आर्थर हेली यांच्याशी २९ वर्षापर्यंत शैलाबाईंनी लग्नजीवन उपभोगिले आहे. माझ्या मिळालेल्या अखेरच्या बातमीनुसार ते अजूनही विवाहबद्ध आहेत. अमेरिकेत मात्र नेम नाही. गेल्या महिन्यात सुद्धा त्यांनी फारकत घेतली असेल. एलिझाबेथ टेलरच्या पाचव्या नवऱ्याची एका मिश्किल संपादकाने (खुशवन्तसिंग का तो?) 'पाचवे मिस्टर एलिझाबेथ' अशी ओळख करून दिली होती!

कोणत्याही जोडप्याने यशस्वीरीत्या २८-२९ वर्षे काढावीत ही एक अवघड किमया आहे आणि एका अत्यंत प्रसिद्ध (अमेरिकन) लेखकाबरोबर एवढी वर्षे सुखासमाधानाने संसार करणे ही तर अधिकच कठीण गोष्ट आहे. कारण लेखक चमत्कारिक असतात. विक्षिप्त, तऱ्हेवाईक, मुलुखावेगळे. ते जेवढे आत्मकेंद्रित असतात तेवढेच हट्टी असतात. आर्थर हेली हे, हे सर्व तर आहेतच; पण ते हळुवार मनाचे, उतावळे, दयाहीन व बेसुमार काम करणारेही आहेत असे शैलाबाई म्हणतात. असल्या माणसाशी जुळवाजुळव करून घेणे म्हणजे केवढी मोठी कामगिरी! 'Prize for being extraordinarily patient and resourceful in married life.' यावद्दल जर कुणी बक्षीस ठेवले तर ते शैलाबाईंना सहज मिळेल. लग्नजीवनाचे Who is afraid of Virginia Woolf झालेलं पुष्कळ वेळा पाहायला मिळतं. गुरगुरणं, कुरकुरणं, भांडणं, पाणउतारा करणं, हवा काढणं, वेशीवर टांगणं, वाकुल्या दाखवणं, आदळणं-आपटणं, मनधरणी करणं, रुसणं हे सर्व लग्नजीवनाचा अविभाज्य आणि अटळ भाग आहे आणि दुसऱ्या जोडप्याला भांडताना पाहिले किंवा ऐकले की, मूळ जोडप्याला किती निरागस समाधान मिळते! ज्या जोडप्यांमध्ये असे होत नाही ती भाग्यवान! जोडप्यांमधील भांडण हा जसा एक विनोदाचा विषय झाला आहे तसाच शोकांतिकेचाही.

व्यक्ती जितकी प्रसिद्ध किंवा श्रीमंत होते त्या प्रमाणात त्या व्यक्तीच्या अपेक्षा उंचावतात. आपण काही आता सोम्यागोम्या राहिलो नाही, तर आपला जोडीदारही आपल्या दर्जाचा असावा हे त्या व्यक्तीला वाटणे साहजिक आहे. Compatibility (सुसंगती) ही फारशी लग्नजीवनात नसतेच. जिथे ती थोडीफार असते तिथे ती खतपाणी घालून वाढवायला हवी. परवाच मी एक धक्कादायक रिपोर्ट वाचला. अर्थात पाश्चात्य देशात. या रिपोर्टमध्ये असे आढळून आले की, समलिंग संभोगवाद्यांना आपल्या जोडीदाराच्या आवडीनिवडी व निकडीविषयी स्त्री-पुरुष जोडप्यापेक्षा जास्त आस्था असते. बायको नवऱ्यापेक्षा मैत्रिणीला किती झुकते माप देते हे सर्वांना माहीत असतेच. हे मत माझे नाही. समलिंगसंभोग हा मला अत्यंत किळसवाणा व unnatural act वाटतो. मी फक्त पाश्चात्य देशात सध्याची विचारसरणी दाखवली आहे.

बाकी आपण नॉर्मन मेलरनी ५ वेळा लग्न केले, एलिझाबेथनी ६ वेळा केले, अशा गाथा वाचून त्यांचा हेवाच करावा. एकाच व्यक्तीशी शरीरसंबंध ठेवून ठेवून तो एक घाशीवपुशीव, गुळगुळीत नाण्यासारखा होतो. लग्न म्हणजे एक झिजलेले लैंगिक नाणेच. अर्थात प्रस्थापित यावर भुवया उडवतील व नाकपुड्या रुंदावतील; पण तरीही सत्य हे सत्यच राहणार. माझ्या म्हणण्यातील सत्य पडताळून पाहायचे असेल तर ज्या पॉल सार्त्र व सीमॉन द Beauvoir (जाणकारांच्या जाळ्यात मला सापडायचे नाही म्हणून उच्चार लिहीत नाही) या लग्न न झालेल्या जोडप्याचे उदाहरण अभ्यासावे. या जोडप्यांनी लग्न न करता एकत्र राहण्याचा उपक्रम सुमारे चाळीसेक वर्षे केला. या जोडप्यांनी असा एक संकल्प केला की, प्रत्येकाने जोडपेबाह्य संबंध ठेवावे व त्याची चर्चा व माहिती एकमेकांना द्यायची! ते सुखी व समाधानी सहजीवन इतका वेळ जगू शकले त्याचे हे एक कारण. कुणी असा वाद घालील की, हा पशुपणा आहे; पण बर्नार्ड शॉच्या म्हणण्याप्रमाणे All Progress means war with society. या लोकांनी फक्त सार्त्रच्या फाकलेल्या प्रतिभेकडे एकच दृष्टिक्षेप टाकावा. अर्थात जगात सर्व सार्त्र नसतात. परत पाश्चात्य देशातील संस्कृतीची पार्श्वभूमी वेगळी वगैरे वाद घालता येतील; परंतु मी असे म्हणेन की, मानसशास्त्राचे ढोबळ नियम पाश्चात्य व पौर्वात्य दोन्ही देशांना सारखेच लागू असतात. का पाश्चात्य देशांमध्ये थंडीमुळे जास्त भूक लागते?

हे सर्व लिहिण्याचे कारण असे की, शैलाबाई व आर्थर या दोघांनीही विवाहबाह्य संबंध ठेवले होते आणि तरीपण किंवा त्यामुळेच त्या दोघांनी सुखी संसार केला. आपल्या देशात पुष्कळ प्रमाणात inhibitions (इंद्रियव्यापारनिग्रह) आहेत हे कोणताही जाणकार मानसशास्त्रज्ञ मान्य करतो. विशेष करून भारतीय स्त्री ही inhibitions च्या बाबतीत निपुण आहे असे संशोधन करून एका लेखकाने प्रतिपादित केले आहे. इंद्रियनिग्रह म्हणजे बुद्धिमत्ता झाकणारे ब्लँकेट. इंद्रियव्यापारनिग्रह हा sexual rehession मुळे होतो. अपराधीपणाच्या भावनेमुळे होतो. काही व्यक्ती इंद्रियव्यापारनिग्रहाकडे मुळातच झुकलेल्या असतात. इंद्रियव्यापारनिग्रह हा अल्कोहोलने बाजूला सरतो. (म्हणूनच इतके लोक पितात की काय हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल) तो सेक्सनेही बाजूला सरतो असे मानसशास्त्रज्ञ म्हणतात. म्हणजे टॅलेंट बाहेर काढायला अल्कोहोल व सेक्सचा बेछूट वापर करावा असे मी सांगत नाही. inhibitory process (इंद्रियनिग्रह) मुळे माणूस आपल्या शक्तीचा पुरेपूर किंवा ५० टक्केही वापर करू शकत नाही, हेच मला सांगायचे आहे. कदाचित एक दिवस इंद्रियनिग्रहावर मात करण्यासाठी छोटीशी केमिकल पीलही निघेल व बुद्धिमत्तेचे पेव फुटेल.

जगात सर्वांत मोकळं हास्य कोण करतं? तर निरागस बालक नाही; पण ज्या व्यक्तीच्या दोन दातांमध्ये थोडी फट आहे व ज्या व्यक्तीचे हेच दोन दात थोडे सशासारखे पुढे आले आहेत ती. शैला व आर्थर यांचे प्रेम पहिल्या दृष्टिक्षेपात निर्माण झाले नाही असे शैलाबाईंनी लिहिले आहे. त्या पुढे म्हणतात. " आर्थरचा तोंडावळा राठ व पसरट आहे. त्याचे दात मोठे आहेत आणि मी पण तशी कामिनी नाही. माझा चेहरा त्या वेळेला फार घामट व तुकतुकीत असे. '

पण आर्थरच्या अफाट श्रीमंतीमुळे " माझा घामटपणा आता कमी झाला आहे. ' असेही शैलाबाई शेवटी थोडचा अभिमानाने सांगतात.

शैला व आर्थर यांचे सहजीवन यशस्वी होण्यास एक मुख्य कारण म्हणजे शैलाबाईंनी आर्थरच्या निकडीचे भान पदोपदी ठेवले.

टॉलस्टॉयच्या संदर्भात असे बोलले जाते की, तुम्हाला जर महान लेखक व्हायचे असेल तर कजागबाईशी लग्न करा. हे सर्व थोतांड आहे. टॉलस्टॉय एक महान लेखक झाला तो त्याच्या अंगभूत महानतेच्या बीजामुळे; भांडखोर बायकोमुळे नव्हे.

लेखक–मग तो छोटा असो अगर मोठा असो–हा एक त्याच्या वेगळचाच विश्वात वावरणारा प्राणी आहे. काही लेखक हस्तीदंताच्या मनोऱ्यातच रमतात तर काही ऐहिक सुखाकडे तुच्छतेने बघतात, तर काहींना ( megalomania) स्वश्रेष्ठपणाचे वेड लागते, तर इतर काही लेखक दुसऱ्या लेखकाचा पाणउतारा करण्यासाठी लिहितात. काही फक्त विनोदीच लिहितात, तर काही विडंबनात्मक. ' मी फक्त थंड विश्लेषण करणारा लेखक आहे, ' ' मी फक्त घडलेलं लोकांपुढे मांडणारा लेखक आहे,' ' मी नेहमी नाण्याची दुसरी बाजू मांडणारा लेखक आहे.' असे लेखकांचे अनेक प्रकार असतात. काही लेखक स्वतःला विचारवंत समजतात तर काही मी समाजप्रबोधन करीत आहे या भ्रमाखाली रमतात. ' सब बकवास ' थोडे लेखक तुम्हाला सांगतील. ' लिखाण हे फक्त वाचकाच्या मनोरंजनासाठी पाहिजे. ' आणि मग एकच वाद उठतो की लेखकाची बांधिलकी कुणाशी ? ' समाजाशी, ' 'वाचकांशी' की 'स्वतःशी' असे बुलंद आवाज आपल्याला ऐकू येतात; पण मला असे वाटते की हे बांधिलकीचं बोचकंच बांधून फेकून द्यावं त्रिहिरीत. साहित्य म्हणजे शेवटी काय ? साहित्य म्हणजे कुणाही व्यक्तीचे अनुभवविश्व तरल शब्दात मांडणे–जेवढचा व्यक्ती तेवढी अनुभवविश्वे. हे अनुभवविश्व गोडच असावे, कडूच असावे, खारट असावे, असेच असावे, तसेच असावे, असे हट्ट धरणे योग्य होणार नाही. ते शक्यही नाही. कुणी अभागी माणसाला किळसवाणा अनुभव आला असेल तर तो चित्रित करण्याचे स्वातंत्र्य त्याला असू नये ? मग ती तर लालबावटेगिरी झाली. मला मात्र लेखकाचे आकर्षण वाटते ते All progress means war with society यामुळे. समाज सुधारायचा असेल तर समाजाशी थंड-गरम युद्ध पुकारावे लागते हे जर खरे असेल तर लेखकाची बांधिलकी समाजाशी होऊ शकते का ?

साहित्य म्हणजे लेखकाला आलेल्या अनुभवविश्वाचा आविष्कार हे म्हणणे कितपत सबळ आहे याचा आपण विचार करू. एखाद्याने वन्य जीवनावर उत्कृष्ट पुस्तक लिहिले तर ते साहित्य ठरेल का ? ते तसे निश्चित ठरले पाहिजे. त्या लेखकाला अभिप्रेत असलेले वन्य जीवन, त्याला अभिप्रेत असलेला वाघ, म्हणजे त्याच्याच अनुभवविश्वाचा आविष्कार शब्दात उतरतो. दुसरा एखादा लेखक प्रेमाविषयी लिहितो. तेही साहित्यच. त्यांनी अनुभवलेलं प्रेम, त्यांनी वाचलेलं प्रेम यावरूनच तो प्रेमावर लिहितो. म्हणजे त्याच्या अनुभवविश्वावरून त्याला अभिप्रेत असलेल्या प्रेमाचा आविष्कार तरल शब्दात उतरतो. परमानसप्रवेशाने ( empathy ) लेखक स्वत.च्या अनुभवविश्वावर मात करू शकतो का, हाही एक प्रश्न विचारण्यासारखा आहे. इथे मग लेखकाची कल्पनाशक्ती मोकाट सुटते; पण मला वाटते जे लेखक ही भयानक अवघड किमया साधतात तेही त्यांच्या अनुभवविश्वावरूनच. लेखकाची कल्पनाशक्ती ही त्याच्या अनुभवाच्या कक्षेवरून उतरलेली असते. किंबहुना स्वतःच्या अनुभवविश्वाखेरीज त्या त्या व्यक्तीसाठी या जगात ठोस आणि भरीव असे काही नसतेच. फार काय, जीवन हाच एक भला मोठा Subjective (स्वतःपुरता) अनुभव आहे. या सव गोष्टींचा विचार केला तर असे आढळून येईल की, फक्त बांधिलकीच्या दृष्टिकोनातूनच साहित्य लिहिले तर ते एकांगी, थिटे, जखडलेले व संकुचित होईल. कारण बांधिलकी हा लेखकाचा एक भाग, एक अंशच असू शकतो आणि भाग किंवा अंश हे whole च्या तुलनेने नेहमीच मर्यादित असतात. अशेष हा शेषापेक्षा कधीच मोठा असत नाही.

आर्थर हेली हा मात्र तपशिलाशी, बारकाव्याशी बांधिलकी असलेला लेखक आहे असे वाटते. निव्वळ त्याच्या लोकप्रियतेचाच निकष लावला तर हा वाचकांशीही बांधिलकी असलेला लेखक आहे असे वाटते. पण लोकप्रियता ही निव्वळ तपशिलाशी बांधिलकी ठेवल्यामुळे आली असे म्हणता येणार नाही. तपशीलवार वर्णनामुळे एक प्रकारचा कंटाळा येतो तो आॅर्थर हेलींची पुस्तके वाचून त्याच्या वाचकाला येत नाही. कुठे थांबावे, कसे मांडावे, शब्दांशी खेळावे कसे या सर्वांचे भान ठेवल्याशिवाय यशस्वी लेखक होता येत नाही. Joseph Conrad सारखे लेखक कमीच. तो एकदा वैतागून बोलून उठला होता, I do not possess the language. The language poossess me ! '

भारतात आर्थर हेलींची चोरी सर्वात जास्त होते. भारतात म्हणे दर महिन्याला एक याप्रमाणे आर्थर हेलींची पुस्तके निघतात. कोणती टायटल्स असतात तेही आर्थर हेलींना माहीत नसते असे म्हटले जाते.

या पुस्तकात असे म्हटले आहे की, आर्थर हेलींनी Final Diagnosis लिहिण्याच्या आधी एका नुकत्याच जन्मलेल्या अर्भकाला आपल्या हातात घेतले होते. पाश्चात्य लेखक त्या त्या क्षेत्रातील अनुभव घेऊन लिहितात असे मी कंटाळा येईपर्यंत वाचले आहे.

आॅर्थर हेली एक कादंबरी लिहायला १८ महिने घेतात असे शैलाबाई लिहितात. या अठरा महिन्यात हे जोडपे अत्यंत शिस्तबद्ध जीवन जगतं. पार्टर्या वगैरे जवळजवळ एकदम बंद ! शैलाबाई पुढे म्हणतात की, आॅर्थर हे morning person व त्या स्वतः night person आहेत. हे जीवशास्त्राच्या सिद्धान्ताला धरून आहे. आपल्यापैकी बऱ्याच लोकांना सकाळी कामाचा हुरूप येतो तर काही लोकांचा उत्साह संध्याकाळी किंवा रात्री उतू जातो. यावरून असे वाटते की, मानवी शरीरात cells ची एक वरखाली होणारी cycle आहे. ही सायकल लोहचुंबकक्षेत्राशी किंवा इतर ग्रहांशी निगडित आहे असा एक सिद्धान्त मी काही दिवसांपूर्वी वाचला होता.

आॅर्थर हेलींची काही काही पुस्तके Too dull ! Too Perfect वाटतात! पण शैलाबाईंचे हे पुस्तक मात्र वाचनीय आहे.

–जे. एन. पोंडा

# संध्याकाळचे पुणे

पृष्ठ ४ वरून

मोकळेपणाने सांगितले आहे. त्या वेळी त्याच्या भित्रेपणाची निर्भर्त्सना करीत लक्ष्मणाने म्हटले की, 'रामा! अरे, तुझी बायको रावण पळवून नेतो याची तुला लाज नाही. पळून तू काय करणार? आपल्या स्त्रीला शत्रूच्या घरी ठेवणार? अरे, तुला अयोध्येला जाण्यासाठी तोंड राहील का? तेव्हा लढता लढता रणांगणात पडलास तरी चालेल; पण पळणे तुला योग्य नाही!'

सीता पळवून नेल्यावर रामाने चालविलेल्या अतिविलापाबद्दलही लक्ष्मणाने रामाला ताडले आहे.

हे सर्व मी अशासाठी सांगतो की, आपल्या पुराणपुरुषांना अतिमानव करण्याचा आपला छंद आहे तो आपणास कळावा. या अतिमानव करण्याने आमच्यावर त्यांच्यासारखे होण्याची जबाबदारी राहात नाही. या महापुरुषांसारखे आपण होणे शक्य नाही हे एकदा कळले की, त्यांचा कोणताच गुण घेण्याचीही आवश्यकता राहत नाही. एकदा थोर पुरुषांचा जयजयकार केला की, आपणास सर्व वाटा मोकळ्या होतात. वाल्मिकीने रामायण लिहिताना जो संयम, खरेपणा राखला आहे तोसुद्धा आपण खोटा ठरवू पाहतो.

आणि देवांचे स्तवन करण्याची सवय इतकी होते की, साधी माणसेसुद्धा परस्परांचे स्तवन करू लागतात. तो प्रकार या उत्सवभर चालू होता. एकमेकांना थोर म्हणण्यात व्यासपीठावरच्या लोकांचा किती वेळ गेला हे फक्त कंटाळलेल्या श्रोत्यांनाच विचारावे आणि एकमेकांना हार घालण्याचा तर अतिरेकच झाला. माझी कल्पना फक्त खेडेगावातल्या समारंभातच असे हार पडतात; पण पुणेही मागे नाही!

¤

गीतरामायणावरून मला अशाच एका दुसऱ्या प्रयत्नाची आठवण आली. यातही अधूनमधून निवेदन करून काव्यातून रामायणकथा सांगितली आहे. फक्त ही काव्ये पुस्तकाच्या संपादकाची नाहीत. प्राचीन मराठी कवींच्या रचनेतून रामायण उभे केले आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे 'नवनीत रामायण' व कर्ते आहेत आपले पं. महादेवशास्त्री जोशी. रामायणावर मराठीत किती कवींनी काव्य केले हे पाहावयाचे असेल तर हे पुस्तक अवश्य वाचावे. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती १९५३ साली प्रसिद्ध झाली. म्हणजे पहिली आवृत्ती १९४५–५० या दरम्यानची असावी. या पुस्तकाचे प्रकाशक 'बलवंत संस्था, रत्नागिरी' हे आहेत. या पुस्तकाची नवी आवृत्ती निघाली तर त्यात ग. दि. मा. यांच्या गीतातले एक गीत घालता येईल.

नवनीत रामायण हे पुस्तक मला जुन्या बाजारात मिळाले. ते पुस्तक वाचून मला अतिशय आनंद झाला. या पुस्तकात रामाणाच्या सात कांडांची सात प्रकरणे आहेत. म्हणजे बालकांडापासून उत्तरकांडापर्यंत. प्रत्येक कांडात मराठी कवींच्या निवडक रचना, त्या कांडाला धरून दिल्या आहेत आणि मधले कथानक गद्यात सांगून रामकथा वाहती ठेवली आहे. आधीपासून मला आवडत्या असलेल्या कविता यात मला वाचावयास मिळाल्या. वामन पंडितांचा रामजन्मोत्सव, आनंदतनयांचे सीतास्वयंवरातील 'हाते थोपटल्या भुजा मज असा नाही त्रिलोकी दुजा' वगैरे श्लोक. वामन पंडितकृत भरतभाव, एकनाथांच्या भावार्थ रामायणातील 'श्रीरामाची विरहावस्था', आनंदतनयकृत 'शबरीची उष्टी बोरे', एकनाथकृत 'सीतेचे मुद्रिकेशी हितगुज', मोरोपंतकृत 'सेतुबंध.' नवनीत रामायण सीता भूमीत गुप्त होते येथे थांबते. हे पुस्तक क्राउन आकाराचे शंभर पानी आहे.

¤

मला या महोत्सवात बऱ्याच त्रुटीही वाटल्या. सवाईगंधर्वमहोत्सवाशी तुलना करता मांडव अगदीच पट्टेवजा व सामान्य होता. पटांगणाचा बहुसंख्य भाग उघडाच होता. पटांगणाभोवती पत्रे उभे करून आवार केले होते; पण या पटांगणाला साधी सपाटी आणण्याचे कष्ट घेतले नव्हते. एवढेच काय उगवलेली झुडुपेही उपटलेली नव्हती. आम्ही बसलो तिथे अक्षरशः खड्डे व मोठाले खडे होते. रोज पंधरा हजार माणसं, बहुसंख्य रोज दोन रुपये देऊन व काही पाच रुपये देऊन येत होती. त्या पैशांत एकदा झुडुपे काढून निदान रोलर तरी फिरवायचा! पण एवढे पैसे जमा होऊनही ही अयोध्यानगरी लंकेची सीताच राहिली होती! मी ही तक्रार करावी हे पुष्कळांना आवडणार नाही. तक्रारीचं वारकऱ्यांसारखं होतं. गैरसोईबद्दल वारकऱ्याने तक्रार केली तर या क्षणभंगुर देहाचा मोह त्याला सुटला नाही असा आरोप केला जातो व तक्रार न करावी तर वारकरी पंथच नेभळट, दुर्बळ असे म्हटले जाते. असो.

या साऱ्या गैरसोई असूनही रोज पंधरा हजारांची उपस्थिती होती. खड्डे व खडे यांवर घालण्यासाठी श्रोते सतरंज्या आणीत होते. मुलाबाळांना घेऊन येणारे दुपटी–चौघडचा घेऊन आले होते. काही श्रोते हातातला टेपरेकॉर्डर उंच धरून टेप करून घेत होते. काहींनी दुर्बिणी आणल्या होत्या. त्यांना फक्त ग. दि. मां. चे गीतरामायण ऐकावयाचे होते. आनंद लुटावयाचा होता. सोय–गैरसोईचा विचार नव्हता!

आणि तो आनंद त्यांना घेऊ न देण्याचा महोत्सवातील बहुसंख्य वक्त्यांनी जणू विडाच उचलला होता! महोत्सवाच्या चालकांनी व्यासपीठावर धनुर्धारी रामाचे चित्र लावून आणि आपल्या व निवडलेल्या वक्त्यांच्या बोलण्यातून शत्रुघ्न रामाचे महत्त्व सांगून परमवीर अजिंक्य रामाची प्रतिमा उभी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांना अभिप्रेत असलेला धनुर्धारी राम ग. दि. मा. यांच्या गीतरामायणातील रामाशी संवादी नव्हता. ग. दि. मा. यांनी स्त्रीजातीचे दुःख आणि मानवाची पराधीनता गीतरामायणातून मांडली. चालकांच्या राजकीय मतांचा व तिचा सुसंवाद साधणं शक्यच नव्हतं. त्यामुळेच कार्यक्रमाच्या पहिल्या भागात श्रोत्यांना काही गम्य नसे. कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागासाठी-मराठी गीतरामायणाच्या सात गाण्यांसाठी ते येत होते.

ही गोष्ट चालकांनी जाणली नाही हे हे दुर्दैव होय. बिंदुमाधव जोशी, बाबासाहेब पुरंदरे, शंकराचार्य यांनी तर अक्षरशः श्रोत्यांना पीळ भरला. एवढे हे मोठे लोक त्यांना का जिभेवर संयम ठेवावयास सांगावयाचे! महोत्सवाच्या शेवटच्या रात्री ही नीरस व्याख्याने ऐकणे अशक्य होऊन

लोकांनी निषेधाच्या टाळ्या पिटल्या. या टाळ्यांतून बिंदुमाधव, बाबासाहेब पुरंदरे, शंकराचार्यच काय पण आश्चर्य म्हणजे आपले यशवंतराव चव्हाणही सुटले नाहीत ! या महोत्सवात ज्या थोड्यांची भाषणे कंटाळवाणी झाली नाहीत त्यात वाजपेयी, वसंत पटवर्धन, कोंडके, शरद पवार व वसंत साठे यांची नावे येतील. वसंत साठे यांनी एक जोक चांगला मारला. आज रजतमहोत्सवाला या व्यासपीठावर जे आहेत त्यांनी या उत्सवाच्या सुवर्णमहोत्सवालाही हजर असावं अशी इच्छा काही वक्त्यांनी प्रदर्शित केली होती. त्यावर वसंत साठे म्हणाले, 'व्यासपीठावरचे लोक सुवर्णमहोत्सवाला असतील पण मी असेनच असे सांगता येणार नाही; कारण आम्हा राजकारण्यांचं काही सांगता येत नाही.'

हा उत्सव अतिशय योजनापूर्वक आखला गेला असावा हे उद्घाटक व प्रत्येक दिवसासाठी निवडलेला पाहुणा व अध्यक्ष यावरून वाटते. सर्व क्षेत्रांतील माणसांना येथे आणले असून आश्चर्य हे की, त्यांत आजचा एकही कवी किंवा लेखक नव्हता ! □

## मुंबई वार्ता : पृष्ठ २ वरून

मुंबईत एक राजकीय ताकद निर्माण करण्याचा प्रयत्न करतील असे दिसते. यामुळे मुंबईत यापुढे राजकीय विचार करताना सामंत यांचा विचार व्हावा असाच त्यांचा प्रयत्न राहील. हे सर्व इतक्या सविस्तर लिहिण्याचे कारण म्हणजे परवाच्या मोर्चाच्या निमित्ताने सामंत यांनी केलेले शक्तिप्रदर्शन व त्यांच्या राजकीय मागण्या.

आपल्या कामगार संघटनांवर पोलिसांचे जे हल्ले होतात ते थांबवावेत, कामगारांना पुरेसे संरक्षण मिळावे या व इतर अशा प्रकारच्या मागण्या या मोर्चात मांडण्यात आल्या; परंतु याचबरोबर "केवळ कंपनीच्या गेटवर युनिअनच्या झेंड्याखाली कामगार एक असतात व बाहेर हेच कामगार विविध पक्षोपक्षात विभागले जातात" अशा प्रकारचे जे शल्य डॉ. सामंत यांनी भाषणातून बोलून दाखवले व त्याचबरोबर "निवडणुकीच्या वेळेस कामगार एकत्र राहिल्यास काही मतदारसंघात त्यांचे उमेदवार निवडून येऊ शकतात" ही जी गोष्ट त्यांनी स्पष्ट केली त्यामुळे कामगारसंघटना ही एक राजकीय ताकद म्हणूनही वापरावी असा वारा दिसतो.

• येत्या विधानसभा निवडणुकीत मुंबईत ४, ठाणे येथे १ व नाशिक येथे १ जागा लढविण्याचा डॉ. सामंत यांचा विचार या वेळी स्पष्ट झाल्याने कामगार–ताकदीचे मतांच्या ताकदीत परिवर्तन करण्याचा कसा प्रयत्न होत आहे हेच स्पष्ट होते; परंतु खरी मेख पुढेच आहे. जेव्हा कामगार कारखान्याच्या गेटवर असतो तेव्हा तो युनिअनच्या झेंड्याखाली असतो; परंतु नंतर तो समाजाचा घटक झाल्याने सामाजिक–राजकीय गोष्टींवर विचार करून मतदान करतो व हीच गोष्ट डॉक्टरांना बदलावयाची आहे असे दिसते.

एक तर प्रत्येक कंपनीच्या कामगारांचे प्रश्न व बाहेरचे वातावरण या गोष्टी भिन्न असतात. युनिअनचा नेता व राजकीय पक्ष यांच्यात कोणाला कोठे जवळ करावे हे कामगारांनाही कळते. त्यामुळे कुर्ल्यापासून विक्रोळीपर्यन्त जे कामगार आपल्याला हजारोंच्या संख्येने साथ करतात तेच निवडणुकीतही आपले उमेदवार निवडून आणतील असे सामंत यांना वाटत असेल तर तसे शक्य नाही.

दुसरे म्हणजे विवक्षित ठिकाणच्या आपल्या ताकदीच्या जोरावर जर राजकीय सौदेबाजी सुरू झाली तर तिचे रूपांतर विजयात नव्हे तर ती ताकदही संपण्यात होते, हा इतिहासच नाही काय ? □

## □ रुळावरून घसरलेली रेल्वेची गाडी

पुण्यात गुढीपाडव्यातला गीतरामायणाला सुरुवात झाली व त्याची सांगता रामनवमीच्या मुहूर्तावर झाली; परंतु मुंबईत मात्र हजारो स्त्री–पुरुषांचा छळ करणाऱ्या लोकलच्या गोंधळाची सुरुवात पाडव्याला झाली व सांगता रामनवमीला झाली. अर्थात गाड्यांचा गोंधळ, होणारा उशीर, प्रवाशांचे हाल या गोष्टी व त्यांची कारणे जेव्हा बोलू लागलो तेव्हा लक्षात आले की, मध्यरेल्वे म्हणजे अनेकांना प्रबंधाला उपयुक्त असणारा विषय आहे.

अशा या गोंधळाने पाडव्यापासून रामनवमीपर्यंत लोकांचे हाल तर झालेच; परंतु त्यामुळेच सरकार कोणतेही येवो, मध्यरेल्वेचा नोकरशाही व बेमुर्वत कारभार काही सुधारणार नाही ही गोष्ट पुन्हा एकदा स्पष्ट झाली. या रेल्वेच्या गोंधळाला जशी नोकरशाही जबाबदार आहे व रेल्वेप्रशासनयंत्रणा जितकी दोषी आहे तितकीच आणखी एक गोष्ट म्हणजे वाढणारी प्रचंड लोकसंख्या व मुंबई महानगरीवर पडतारा प्रचंड ताण, या गोष्टीही कारणीभूत आहेत.

रेल्वेचे 'नामांकित' रूळ गाड्यांच्या गोंधळाचे पहिले कारण ! वर्षानुवर्ष आपल्या ताकदीबाहेर काम करीत राहिलेले हे रूळ बदलण्याची अनेक वेळा रेल्वेप्रशासनाने घोषणा करूनही ते बदललेले नाहीत. परिणामी रूळ व गाड्या यांचा संपर्क सुटला की 'ट्रेन डिरेलमेंट' हा प्रकार घडतो. आता हे रूळ बदलण्याचे काम चालू आहे असे म्हणतात. होईल तेव्हा खरे !

आणखी एक गोष्ट म्हणजे एकमेकांना छेद देऊन जाणारे गाड्यांचे वेळापत्रक. म्हणजे असे की, दोन गाड्या सुटण्याची व एखाद्या स्टेशनात प्रवेश करण्याची वेळ अनेकदा एकच असते. ठाण्याला हा अनुभव नेहमी येतो. ८·४४ ला डोंबिवलीला येणारी फास्ट व स्लो गाडी. या दोन्ही गाड्यांपैकी एकीचे वेळापत्रक रोज बिघडते. त्याचे कारण म्हणजे दुसरीला वाट करून देण्यासाठी एकीला ठाणा पुलाजवळ थांबावेच लागते. अशा किती तरी गाड्या!

रेल्वेच्या पुलाचा प्रवाशांकडून न होणारा वापर व त्यामुळे होणारे अपघात हे विलंबाचे आणखी एक कारण ! अनेक वेळा लोक सोइस्करपणे रेल्वेरुळांचा वापर करतात व गाडीसाठी धावतात आणि स्वत:चे आयुष्य व अनेकांचा वेळ गमावतात. एक अपघात झाला की, ५००० मिनिटे फुकट जातात हे गणित आहे; परंतु रेल्वेप्रशासनही पोलिसांकरवी या रूळ ओलांडणाऱ्यांवर कारवाई करीत

नाही व 'जाणारे जातात मृत्यु पावणारे मृत्यु पावतात!' अर्थात अनेक ठिकाणी (उदा. अंबरनाथ) पूलही इतके गैरसोयीचे आहेत की, त्यांचा उपयोग रोज १५० माणसेही करीत नाहीत! असो.

रेल्वेप्रशासनाचा अपुरा कर्मचारीवर्ग हेही गाड्यांच्या गोंधळाचे चौथे कारण. रोज रात्री गाडीतील प्रत्येक डबा आणि डबा 'चेक' करावा अशी अपेक्षा असते; परंतु सर्व डबे चेक करणे व रात्री तीन तासात–गाड्या बंद असताना–त्यांची दुरुस्ती करणे ही केवळ अशक्य गोष्ट आहे. मग होते काय डबा पूर्णपणे बिघडेपर्यन्त त्याकडे दुर्लक्ष होते व रामनवमीसारख्या दिवशी तो 'राम' म्हणतो व प्रवाशांचे हाल होतात! प्रत्येक डब्याची पूर्ण दुरुस्ती करणे शक्य होण्यासाठी पुरेसा 'स्टाफ हवा'; पण तो पुरवणार कोण?

तसेच आपल्याकडे संख्येने अत्यंत कमी असलेले रेल्वेचे 'डबे' हेही कारण आहे. हे डबे पेरांबूरच्या कारखान्यात बनतात व तेथून मुंबापुरीत पोहचतात; परंतु त्यांचीच कमतरता आहे. इतकी की दंगल वगैरे झाली व १–२ डबे निकामी झाले तर ५–१० गाड्या बंद होतात व प्रवाशांच्या हालात भर पडते.

रामनवमीला कुर्ला व शीवच्या दरम्यान मालगाडी घसरली व परिणामी गाड्यांचा खोळंबा झाला. त्याच ठिकाणी नेहमी ही 'घसरण' कशी होते याचा शोध घेतला गेला पाहिजे, ही प्रवाशांची मागणी आहे. परंतु 'आधी फाशी मग चौकशी' याप्रमाणे आधी 'अपघात व मग शोधसमिती' असा मध्यरेल्वेचा कारभार आहे.

याउलट पश्चिम रेल्वेचा प्रवास केवढा तरी सुखकारक. याचे कारण म्हणजे तेथे अंधेरी, बोरिवली, विरार, वसई इत्यादी थोडीच गाडी पोचण्याची ठिकाणे आहेत. त्यामुळे त्रास कमी! उलट मध्यरेल्वेवर कल्याण, अंबरनाथ, कर्जत, कसारा, बदलापूर, टिटवाळा, ठाणे, कुर्ला, घाटकोपर इत्यादी बरीच टर्मिनस आहेत व तेवढाच त्रास जास्त होतो.

अर्थात या सर्व गोष्टी लक्षात घेऊन रेल्वेप्रशासनाने गेल्या दहा वर्षांत परिस्थितीशी सामना करण्यासाठी सुयोग्य यंत्रणा निर्माण करण्याचा प्रयत्न केलाच नाही, ही चूक काय प्रवाशांची? अमेरिकेत अंतराळयान सुटायला एक मिनिट उशीर झाल्यावर त्या वेळचे अध्यक्ष निक्सन यांनी राष्ट्राची जाहीर माफी मागितली होती आणि येथे? मुंबईतील रेल्वेप्रशासन म्हणते की, गाडी ५ मिनिटे उशीरा किंवा लवकर (!!) आली तर ती वेळेवर आली असे समजावे!

या सर्व कारणांचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समित्या व त्यांचे अहवाल यामध्येही खूप पैसा खर्च झाला आहे; पण उपयोग काय? फक्त प्रा. मधू दंडवते यांनी रेल्वेमंत्री असताना गाड्यांच्या नियमितपणात सुधारणा व्हावी म्हणून प्रयत्न केला होता व खा. रामभाऊ म्हाळगी हेच एक लोकप्रतिनिधी असे आहेत की, जे सातत्याने यात लक्ष घालून अर्ज, विनंत्या, प्रश्न इत्यादी सर्व वैधानिक मार्गांनी रेल्वेची घसरलेली 'गाडी' रुळावर यावी म्हणून प्रयत्न करीत आहेत.

आता तर १९८२ पर्यंत यात सुधारणा होणार नाही असे बेशरमपणाचे उत्तर रेल्वेचे अधिकारी देत आहेत. असाहाय्य प्रवाशांच्या जखमेला चोळलेले हे मीठच नव्हे का? या सर्वांचा विचार करून जेव्हा एखादा अभ्यासगट दूरगामी किमान 'दशवर्षांचा' विचार करून यात आमूलाग्र परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न करील तो खरा सुदिन!

नाही तर हे 'रामायण' वर्षानुवर्षे चालूच राहणार व रेल्वेयंत्रणेला दोष देत लाखो प्रवासी हे रामायण बघत राहणार, नव्हे असाहाय्यपणे सोसत राहणार व मुंबईतील वाढत्या लोकसंख्येच्या दाबाबरोबरच हे (रड)गाणेही लांबत राहणार!

□


**मान्यता पावलेला चरित्रग्रंथ**

# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

चित्रपट । सदानंद बोरसे

# COMA

## एक वेधक रहस्यकथा

एम्. जी. एम्. च्या बॅनरखाली मान वळवून डरकाळी फोडणारा तो जंगलचा राजा बऱ्याच दिवसांनी पाहिला आणि उगाचच बरे वाटले. मुंबापुरी प्रचंड गाजवून एम्. जी. एम्. चा 'COMA' हा चित्रपट पुण्यात प्रदर्शित झाला.

रॉबिन कुक याच्या 'Coma' याच नावाच्या अतिशय गाजलेल्या कादंबरीवरून हा चित्रपट काढण्यात आला आहे.

बोस्टन मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये अतिशय सीध्यासाध्या उपचारांसाठी आलेले तरुण धडधाकट लोक बेशुद्धावस्थेत जात. डॉ. सुझान (Genevieve Bujold) या तरुणीला या प्रकाराचा संशय येऊन ती त्याचा पाठपुरावा करते. शेवटी या बेशुद्ध लोकांच्या शरीरांमधून त्यांचे निरोगी अवयव काढून ते प्रचंड किमतीला अन्य गरजूंना आरोपणासाठी विकले जातात असे उघडकीस येते. या संपूर्ण काळ्या धंद्याच्या मागे हॉस्पिटलमधील प्रमुख सर्जन डॉ. हॅरिस (Richard Widmark) याचाच हात असल्याचे उघडकीस येते.

या कथेची पटकथा व दिग्दर्शन Michael Crichton यांनी केले आहे. चित्रपटाच्या सुरुवातीपासून एक वेग आणि ताण कायम राखणारी पटकथा हे चित्रपटाचे प्रमुख वैशिष्टय. 'Coma' ही एक शास्त्रीय रहस्यकथा आहे. वैद्यकीय क्षेत्रातील काही विसंगती (उदाहरणार्थ-अमुक अमुक व्यक्तीला कार्बन मोनॉक्साइड या वायूमुळे बेशुद्धावस्था आली आहे, ही माहिती एकदम शवविच्छेदनाच्या वेळीच का मिळते? तत्पूर्वी त्या व्यक्तीच्या रक्तातील वायूंचे प्रमाण तपासण्याची काळजी कुणीच का दाखवीत नाही?) सोडून दिल्या तरी रहस्यकथा म्हणून काही गोष्टी चमत्कारिक वाटतात. उदाहरणार्थ-बेशुद्धावस्थेत गेलेल्या व्यक्तींच्या फाइल्स पाहताना शस्त्रक्रिया करणारा सर्जन, शस्त्रक्रियेपूर्वी बधिरावस्था देणारा तज्ज्ञ, काळ, त्या व्यक्तींच्या तक्रारी इत्यादी सर्व गोष्टी तपासून त्या वेगवेगळ्या असल्याचा निष्कर्ष काढणाऱ्या डॉ. सुझानच्या चाणाक्ष नजरेतून या व्यक्तींच्या शस्त्रक्रियेचे स्थळ हा महत्वाचा दुवा कसा निसटला? या सर्व शस्त्रक्रिया 'OR-8' या एकाच खोलीत झाल्या होत्या, हे तिच्या फार उशिरा व तेही योगायोगाने ध्यानात येते. चित्रपट संपल्यावर मुख्य सर्जनच खलपुरुष असलेला पाहून 'च्यायचे डॉक्टर!' असे बहुतेकांच्या डोक्यात येत असेल. त्यामुळेच मुंबईच्या काही डॉक्टरांनी 'Coma'वर बंदी घालण्याची मागणी केली होती म्हणे. शेवटचा हा वैद्यकीय व्यवसायातील 'दुष्ट् राक्षस मेला!' एवढा कथेसाठीचा आवश्यक भाग सोडल्यास बाकी संपूर्ण चित्रपटात विशेषतः मध्यंतरापर्यंत एका हॉस्पिटलचे वातावरण आणि तेथील वेगवेगळ्या विभागांतील तज्ज्ञांच्या व्यक्तिरेखा अतिशय सुंदर उभ्या केल्या आहेत. विशेषतः वैद्यकीय क्षेत्रातच काम करणाऱ्या प्रेक्षकांना हे विशेष जाणवते. ऑपरेशनपूर्वी धाडधाड पेशंटची सर्व माहिती पुरविणारे निवासी डॉक्टर, ऑपरेशन थिएटरमध्ये फारसे काही कळत नसताना डोके खुपसून पाहण्यासाठी धडपडणारे विद्यार्थी, प्रत्यक्ष ऑपरेशनच्या वेळी काही विसंगत घडत नसेपर्यंत अत्यंत आरामात काम करणारे तज्ज्ञ (अन्यथा आपल्याकडे हिंदी चित्रपटांमधील सर्जन साधे टॉन्सिल्ससुद्धा हृदय बदलत असल्याच्या गंभीर थाटात काढतात), ब्रह्मदेवापासून यमापर्यंत सगळ्यांचे शवविच्छेदन सारख्याच स्थितप्रज्ञतेने करणारे तज्ज्ञ, हॉस्पिटलमध्ये चालू असलेले राजकारण इत्यादी अनेक गोष्टींचा उल्लेख करता येईल. या सगळ्याच गोष्टी अतिशय बारीकसारीक तपशिलानिशी टिपल्या आहेत. मध्यंतरापर्यंत आपण एका खऱ्याखुऱ्या हॉस्पिटलमध्येच वावरत असतो. त्यानंतर मात्र नेहमीचेच पाठलाग, लपंडाव, भोज्याला शिवल्यावर सुटका असे रहस्यमय खेळ सुरू होतात. या सगळ्या खेळांमध्ये एकदा उगाचच मृतदेह ठेवलेल्या एका हॉलमध्ये हे शिवणापाणी दाखवून 'रस हाय!' करायला लावले आहे. संपूर्ण रहस्यकथेला शास्त्रीय ड्रग वगैरे देण्यासाठी जेफरसन इन्स्टिटयूट नावाच्या एका संस्थेत तारांनी लटकविलेले बेशुद्धावस्थेतील रुग्ण हिरव्या-निळ्या प्रकाशात दाखवून टाकले आहेत. चित्रपटाचा शेवट-आपले पितळ उघडे पडल्यानंतर निराश अवस्थेत विमनस्क डॉ. हॅरिस, बस् एवढेच; मग 'गुन्हेगाराला शासन झालेच पाहिजे!', पोलीस, ग्रुप फोटो काहीही नाही, हाही एक अत्यंत संयमित हाताळणीमुळे उल्लेखनीय भाग.

चित्रपटातील आधी उल्लेखलेले Genevieve Bujold, Richard Widmark हे कलाकार, डॉ. सुझानच्या प्रियकराच्या-मार्कच्या भूमिकेतील Michael Douglas या प्रमुख कलाकारांपासून सगळ्याच बारीकसारीक भूमिकांमधील कलाकारांपर्यंत सगळ्यांचा अभिनय सुरेख. विशेषतः डॉ. सुझानची अस्वस्थता, तडफड, सगळ्यांनीच तिच्यावर अविश्वास दाखवून तिला धुडकावल्यानंतरची अगतिकता, सर्व अडथळ्यांवर मात करून छडा लावण्याचा निश्चयीपणा इत्यादी अनेक पैलू Genevieve Bujold या अभिनेत्रीने जिवंत केले.

चित्रपटाचे संगीत-Jerry Goldsmith. मध्यंतरापर्यंत आजूबाजूला चालू असलेले वा नसलेले आवाज यांचाच वापर करून मध्यंतरानंतर मात्र पार्श्वसंगीताचा वापर केला आहे. मध्यंतरानंतर मात्र क्वचित कर्कशपणा सोडल्यास चित्रपटाचा वेग कायम ठेवण्यास त्याचा चांगलाच उपयोग होतो.

ज्या प्रमाणात 'Coma' ची हवा केली गेली, त्याचा विचार करता तो 'हादरविणारा, अस्वस्थ करणारा' वगैरे वगैरे चित्रपट अजिबातच नाही; पण तुम्हाला शेवटपर्यंत उत्कंठा वाटेल अशा रीतीने सादर केलेली एक वेधक रहस्यकथा आहे. ☐